www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ५३ | शनिवार, ०१ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514






**भारताचे पहिले उप पंतप्रधान, लोहपुरुष आणि एकीचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**

**( दैनिक युवक आधार )**

# शेतकऱ्यांना 30 जूनपर्यंत कर्जमाफी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

राज्यातील शेतकऱ्यांना ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रात्री येथे केली.

“कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती आम्ही गठीत केली आहे. एप्रिलपर्यंत या समितीने शिफारस करायची आहेत. त्या आधारावर पुढची प्रक्रिया करून तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्यात येईल” असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार, शेतकरी आंदोलन शिष्टमंडळातील प्रतिनिधी माजी राज्यमंत्री ओमप्रकाश बच्चू कडू, खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर, वामनराव चटप, रविकांत तुपकर, राजन क्षीरसागर, गिरीश दाभाडकर, अजित नवले यांच्यासह सर्व प्रमुख विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि आयुक्त, वरिष्ठ



अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, “नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक आहे, कारण तसे केले नाही तर रब्बीची पेरणी त्यांना करता येणार नाही. म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरण याला प्राधान्य आहे. पूर्व अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पॅकेजच्या माध्यमातून ३२ हजार कोटी रूपये मदत दिली जात आहे. आत्तापर्यंत ८००० कोटी रुपये खात्यात दिले गेले आहेत. या आठवड्याअखेर १८,५०० कोटी रुपये दिले जाणार असून पंधरा दिवसात ९० टक्के शेतकऱ्यांच्या थेट खात्यात रक्कम जाईल या दृष्टीने तरतूद केली असून निर्देश दिले आहेत.”

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,” आमच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा निर्णय होता. पण ही तात्कालिक बाब आहे. दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. कर्जाची वसुली जूनपर्यंत होते, त्यामुळे जूनपर्यंत मुदत आहे. याबाबत आंदोलकांशी झालेल्या सकारात्मक चर्चा झाली असून या भूमिकेशी सर्व नेत्यांनी सहमती दर्शवली आहे. अन्य विषयांवर पुढच्या आठवड्यात बैठक घेणार आहे “

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की कर्जमाफी कशी करायची याबाबत एप्रिलपर्यंत समिती शिफारस करेल शिफारशीच्या आधारावर पुढच्या तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करणार. नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक असून रब्बीची पेरणी करता यावी, म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरणास प्राधान्य आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शनिवारी पनवेलमध्ये 'संगीत मॅरेथॉन'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शनिवार दिनांक ०१ नोव्हेंबर रोजी 'उत्कर्ष संगीत मैफिल' तर्फे मराठी आणि हिंदी सुमधूर ७५ गाण्यांचा बहारदार कार्यक्रम अर्थात संगीत मॅरेथॉन पनवेलमध्ये होणार आहे.

गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे हा संगीत कार्यक्रम सकाळी ११.३० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग होणार आहे. या कार्यक्रमात गायक गोपाळ पाटील स्वतः ७५ गाण्यांची मनमोहक सादरीकरणे करणार असून, या कार्यक्रमात उरण, पनवेल आणि नवी मुंबई येथील ७५ गायकांचा गायक म्हणून सहभाग लाभणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. गेली पाच दशकाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली आहे आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबीर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा अशी विविध समाजोपयोगी उपक्रमे संपन्न झाली असून पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रमे होणार आहेत. त्याच अनुषंगाने उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत ७५ गाण्यांची संगीत मॅरेथॉन होणार आहे.

या सामाजिक उपक्रमांच्या मालिकेतच ‘संगीत मॅरेथॉन’ हा सांस्कृतिक सोहळा पनवेलकरांसाठी एक सुरेल मेजवानी ठरणार आहे.

## पनवेल तालुका पोलिसांतर्फे वॉकयाथॉनचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांतर्फे एकता दौड, एक धाव, एक भारत, एकता आमची ताकद या हे ब्रीदवाक्य घेऊन वॉकयाथॉनचे आयोजन नेरे पोलीस चौकी ते नेरपाडा, कोप्रोली यादरम्यान करण्यात आले होते.

पनवेल तालुका पोलिसांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकता दौड, वॉकयाथॉनमध्ये आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवक, पोलीस पाटील,



पत्रकार सहभागी झाले होते. नेरे पोलीस चौकी नेरे गाव ते कोप्रोली पर्यंत वॉकयाथॉनचे आयोजन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील, शिक्षिका, विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

## सर्कस'चा फलक इंग्रजी भाषेत; कार्यवाही करण्याचे सहाय्यक कामगार आयुक्तांचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

खारघर सेक्टर-१४ मध्ये सुरु असलेल्या गोल्डन सर्कस या आस्थापनाने मराठी देवनागरी भाषेत फलक न लावल्याची तक्रार 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना'चे पदाधिकारी गणेश बनकर यांनी पनवेल येथील कामगार उपआयुक्त यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्वरित योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन रायगड जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त मनीषा काटकर यांनी मनसे पदाधिकारी गणेश बनकर यांना पत्राद्वारे दिले आहे.आस्थापना धारकांनी आपल्या दुकानासमोर फलक मराठी भाषेत लावावे, असा राज्य शासनाचा शासकीय अधिनियम असूनही खारघर सेक्टर-१४ मध्ये नुकतीच 'गोल्डन सर्कस' नांवाने सर्कस सुरु झाली आहे. सर्कस चालकाने 'गोल्डन सर्कस' नाव इंग्रजी भाषेत लिहिल्यामुळे मनसे पदाधिकारी गणेश बनकर यांनी सर्कस चालकाकडे मराठी भाषेत 'गोल्डन सर्कस'चा फलक लावण्याची मागणी केली. मात्र, सर्कस चालकाने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे गणेश बनकर यांनी पनवेल येथील कामगार उपायुक्त यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. सदर तक्रारीची दखल घेवून रायगड सहायक कामगार आयुक्त मनीषा काटकर यांनी कार्यालयाकडून 'गोल्डन सर्कस'च्या फलकाबाबत योग्य ती कार्यवाही त्वरित केली जाईल, अशा आश्वासनाचे पत्र गणेश बनकर यांना दिले आहे.

## पालघर येथील खोल समुद्रात वादळात बंद पडून अडकलेल्या बोटी करंजा गावात सुरक्षित परत

**अतीश कोळी च्या या धाडसच सर्वत्र कौतुक**

**दैनिक युवक आधार**

**महारष्ट्र प्रतिनिधी :** करंजा गावातील तीन बोटी अरबी समुद्रात पालघर येथील खोल समुद्रात आत्ताच आलेल्या वादळातसुमारे 3 दिवसा पासून बंद पडून अडकलेल्या होत्यायाचा सुगावा करंजा गावातील तरुण मच्छिमार श्री. अतीश सदानंद कोळी राहाणार नवापाडा यांनालागला असता यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या छोट्या



मच्छिमार बोटीतून त्या ठिकाणा जाऊन या तीन बोटींना सुखरूप करंजा बंदरात आणण्यात यश मिळविलेआहे..या तीन बोटी मध्ये एकूण 16 खलाशी होते. त्यांच्या कडील पाणी तसेच अन्नसाठा ही संपलेला मात्र प्रयत्नाची शर्थ करून खवळलेल्या समुद्रांतील लाटा बरोबर झुंज देत. अतीश कोळी यांनी खलाशांना वाचविण्यात यश मिळविलेव बोटीही सुखरूप पणे किनारी आणल्या .अतीश कोळीच्या या धाडसच सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांचावर अभिनंदनाचा वर्षाव होता आहे

## सरदार वल्लभ भाई पटेल जयंती निमित्त पोलीस प्रशासनाची वॉक फॉर युनिटी रॅली

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजितसिह ठाकुर**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 31 ऑक्टोबरच्या सकाळी पोलीस प्रशासन वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या निर्देशानुसार व रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी 7 वा. वॉक फॉर युनिटी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार,डॉ.अशोक इंगोले अध्यक्ष डॉक्टर असोसिएशन, रवी अंभोरे अध्यक्ष श्रमिक पत्रकार संघ, सतीश शेवदा मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड, प्रतिष्ठित नागरिक बबनराव मोरे, मंचकराव देशमुख डॉ. विनोद कुलकर्णी प्राचार्य




उत्तमचंद बगडिया महाविद्यालय, संतोष आघाव सहाय्यक पोलीस निरीक्षक इत्यादी मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून वॉक फॉर युनिटी रॅली ची सुरुवात उत्तमचंद बगडिया महाविद्यालयातून करण्यात आली. बगडिया महाविद्यालय, जिजाऊ हिंगोली रोड, माणुसकी नगर, संत गजानन महाराज मंदिर, पंचायत समिती,शिवाजी हायस्कूल असे मार्गक्रमण करीत रॅलीचा समारोप उत्तमचंद बगडिया महाविद्यालयात करण्यात आला. प्रसंगी प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले सरदार पटेल आणि भारत देशाला स्वातंत्र्यानंतर एक संघ ठेवण्यासाठी महत्वपूर्ण कार्य करून आपल्या राजकीय इच्छाशक्ती,राष्ट्रनिष्ठा व सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला सरदार पटेल यांनी अनेक संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन करून देश संघटित ठेवला.देशाचे पहिले गृहमंत्री म्हणून त्यांचे निर्णय फार महत्त्वाचे, देहहिताचे आणि धाडसी असल्यामुळे त्यांना लोहपुरुष या उपाधीने सुद्धा सन्मानित करण्यात आले. पटेलांच्या कार्यांला उजाळा मिळावा म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे व सर्व पोलीस अधिकारी कर्मचाऱ्याने अतिशय नियोजनबद्ध रॅलीच्या आयोजन केले.या रॅलीमध्ये युवा वर्गांचा मोठ्या संख्येने सहभाग होता पत्रकार, शिक्षक, पोलीस अधिकारी पोलीस पाटील संघटना, सामाजिक संघटना यांनी या रॅलीत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन केले.

## आम्ही मुलुंडला जाणार नाही – धारावीकरांचा निर्धार; सरसकट धारावीकरांना धारावीतच घरे द्या

**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

धारावी पुनर्विकासाअंतर्गत अपात्र धारावीकरांचे पुनर्वसन मुलुंड येथील मिठागराच्या जागेवर करण्याचा मार्ग राज्य सरकारने नुकताच एका शासन निर्णयाद्वारे मोकळा केला आहे. मुलुंडमधील ४१.५० एकर मिठागराच्या जागेसाठी धारावी पुनर्विकास प्रकल्पाची (डीआरपी) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र धारावीकरांनी मुलुंडमध्ये न जाण्याचा ठाम निर्धार केला आहे.



सरसकट धारावीकरांना धारावीतच घरे द्यावी, अशी मागणी ‘धारावी बचाव आंदोलन’ने केली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पहिल्यांदाच अपात्र रहिवाशांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे. या अपात्र धारावीकरांना धारावीबाहेर भाडेतत्वावरील गृहनिर्माण प्रकल्पात सामावून घेतले जाणार आहे. त्यासाठी डीआरपीकडून मोठ्या प्रमाणावर मुंबईतील विविध ठिकाणच्या जागेची मागणी करण्यात आली आहे. मुलुंड, कुर्ला, कांजूरमार्ग, भांडूप, मालवणी अशा ठिकाणी अपात्र धारावीकरांसाठी भाडेतत्त्वावरील घरे बांधण्यात येणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे काही ठिकाणची जागा मिठागराची आहे. मिठागराच्या जागेचा वापर केल्यास पर्यावरणाचा ऱ्हास होईल असा आक्षेप घेत या जागेला विरोध होत असताना, तसेच यासंबंधीची याचिका सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना राज्य सरकारने अखेर मुलुंडमधील मिठागराच्या जागेवरील बांधकामाचा मार्ग मोकळा केला आहे. मुलुंडमधील ५८ एकरपैकी ४१.५० एकर जागेसाठी डीआरपीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यासंबंधीचा शासननिर्णय नगर विकास विभागाने सोमवारी प्रसिद्ध केला. या शासननिर्णयामुळे आता ४१.५० एकरावर अपात्र धारावीकरांसाठी घरे बांधण्यात येणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयामुळे एकीकडे मुलुंडकर, तर दुसरीकडे धारावीकर नाराज आहेत.

लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीतील सर्व नेत्यांनी मुलुंडमधील एक इंचही जागा धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी दिली जाणार नाही, असे आश्वासन मुलुंडकरांना दिले होते. मात्र आता या आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता लावून महायुती सरकारने मुलुंडच्या जागेसाठी डीआरपीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करून मुलुंडकरांच्या तोंडाला पाने पुसल्याची टीका ठाकरे गटाचे खासदार संजय दिना पाटील यांनी केली आहे.

तर धारावीकरांचे धारावीतच पुनर्वसन व्हावे ही आमची मागणी असून या मागणीसाठी गरज पडल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशाराही त्यांनी दिला. तर दुसरीकडे ‘धारावी बचाव आंदोलन’नेही आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. आतापर्यंत जे दोन प्रारुप परिशिष्ट-२ प्रसिद्ध झाले आहे, त्यात मोठ्या संख्येने धारावीकरांना अपात्र करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने धारावीकरांना अपात्र करून धारावीबाहेर फेकायचे आणि धारावीची जागा अदानीला आंदण द्यायची असा हा डाव आहे. पण हा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. सरसकट धारावीकरांना धारावीतच घरे मिळाली पाहिजेत, एकही धारावीकर धारावीबाहेर जाणार नाही, असा निर्धार ‘धारावी बचाव आंदोलन’चे समन्वयक माजी आमदार बाबुराव माने यांनी व्यक्त केला. रविवारी (२ नोव्हेंबर) धारावीतील टिळक नगर येथे ‘धारावी बचाव आंदोलन’ची जाहीर सभा आयोजित करण्यात आली असून या सभेत धारावीतच घरे मिळावीत यासाठीच्या आंदोलनाची दिशा ठरवली जाणार असल्याचेही माने यांनी सांगितले.

# वैश्विक आणि पोफाळी पोलीस स्टेशन यांच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**



राष्ट्रीय एकता दिवस म्हणजे भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती म्हणून साजरा केला जातो. सरदार पटेल यांना 'भारताचे लोहपुरुष' म्हणून ओळखले जाते. हा दिवस देशाची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्याच्या त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाला आदरांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो.

त्यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५६० हून अधिक संस्थानांना एकत्र आणून भारताचे राजकीय एकीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.भारत सरकारने सन २०१४ मध्ये सरदार पटेल यांच्या जन्मदिवसाला राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली या दिवशी देशभरात 'रन फॉर युनिटी' सारखे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात त्याच अनुषंगाने पोफाळी पोलीस स्टेशन आणि वैश्विक विकास संस्था मुळावा द्वारे 'एक दौड देश कि एकता और अखंडता के लिये' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यामध्ये श्री नरसिहं पेट्रोलपंप मुळावा फाटा ते धनज रोड ने खोकलेवाडी असे एकूण 4 कि. मी ची दौड घेण्यात आली विजेते 3 स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले यावेळी पोफाळी पोलीस स्टेशन चे ठाणेदार पंकज दाभाडे व त्यांचे सहकारी आणि वैश्विक विकास संस्था मुळावा चे अध्यक्ष अजय झरकर सर आणि त्यांची टीम उपस्थित होती सोबतच संदीप खंडाळे, अमोल डुब्बेवार, कैलास मोरे पोलीस पाटील गंगनमाळ, प्रल्हाद वायचूळे पाटील पार्डी, बर्डे पाटील मुळावा, नागापूर कदम पाटील व परिसरातील नागरिक आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी मुलींचे रक्षण व समाजाच्या अस्तित्वासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत

## महादेव कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गुलाब गांगोडे यांनी दिले प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**



(पिंपळगाव बसवंत) महादेव कोळी महासंघाच्या वतीने प्रांत अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये वयात आलेल्या युवक–युवतींनी पालकांच्या संमतीशिवाय विवाह करण्याच्या वाढत्या प्रथेबाबत आणि आदिवासी समाजातील मुलींचे इतर समाजातील व्यक्तींशी होणाऱ्या विवाहाचे वाढते प्रमाण यावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पालकांच्या संमतीशिवाय होणाऱ्या विवाहांवर नियंत्रण आणण्यासाठी तसेच आदिवासी मुलींच्या संरक्षणासाठी शासनाने तातडीने सर्वसमावेशक धोरण तयार करावे, अशी मागणी करण्यात आली.

सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या अनेक युवक–युवती पालकांच्या विरोधात जाऊन कोर्ट मॅरेज किंवा इतर संस्थांमार्फत विवाह करत आहेत. यामुळे पालकांचा सन्मान धोक्यात येतो, कुटुंबात तणाव निर्माण होतो आणि काही वेळा मानसिक दडपणामुळे आत्महत्येसारख्या घटना घडतात. ही गंभीर सामाजिक समस्या असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.तसेच, आदिवासी समाजातील मुलींचे इतर समाजातील व्यक्तींशी विवाहाचे प्रमाण वाढत असून, अशा विवाहांमुळे संबंधित मुली आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या जमीन, शिक्षण, नोकरीतील आरक्षण आणि शासकीय योजनांचा अनुचित लाभ घेत आहेत, असेही निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचे सामाजिक व आर्थिक नुकसान होत असून, यावर नियंत्रण आणणे अत्यावश्यक असल्याचे कोळी महासंघाने स्पष्ट केले.

याशिवाय, आदिवासी भागात काही दलाल गरीब कुटुंबातील मुलींचे विवाह जनरल समाजातील व्यक्तींशी लावून कमिशन घेत असल्याचे धक्कादायक प्रकार घडत असल्याचेही नमूद करण्यात आले. या अमानवीय आणि बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करून अशा एजंटांचा बंदोबस्त करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

**महत्वाच्या मागण्या:**

1.वयात आलेल्या युवक–युवतींनी विवाह करताना दोन्ही पालकांची उपस्थिती व लेखी संमती अनिवार्य करावी.

2.पालकांची संमती नसल्यास कोणतीही विवाह संस्था किंवा नोंदणी अधिकारी यांनी विवाह लावू अथवा नोंदणी करू नये.

3.इतर समाजातील व्यक्तींशी विवाह केलेल्या आदिवासी मुलींची जात पडताळणी प्रमाणपत्रे रद्द करावीत.

4.अशा व्यक्तींना आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या जमीन, शिक्षण, नोकरीतील आरक्षण व शासकीय योजनांचे लाभ देऊ नयेत.

5.शासनाने या विषयावर स्पष्ट व सर्वसमावेशक धोरण तयार करून अंमलबजावणीसाठी आदेश द्यावेत.

6. आदिवासी भागात विवाह दलाली करणाऱ्या एजंटांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

या निवेदनावर महादेव कोळी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष गुलाब गांगोडे यांनी स्वाक्षरी केली असून,मा. नामदेव देवराम गावित (सामाजिक कार्यकर्ते, महाराष्ट्र राज्य), तसेच मोतीराम गांगोडे, पांडुरंग गावंडे, नामदेव खांडवी, उत्तम चौरे, सुरेश वाघ, नंदा कराटे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पायी हळु हळु चाला, मुखाने मन्मथ मन्मथ बोला!!!

## आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा पदयात्रेत सहभाग

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :**



"पायी हळु हळु चाला,मुखाने मन्मथ मन्मथ बोला, माऊली माऊली, गूरुराज माऊलीच्या जयघोषात आणि भक्तांच्या उत्साहात शिरूरआनंतपाळ ते कपीलधार पायी पदयात्रा मार्गस्थ झाली. या पदयात्रेचा शूभारंभ या मतदार संघाचे आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी अनंतपाळ मंदिरात विधीवत पुजन करून खांद्यावर भगवा पथका घेऊन सहभाग नोंदविला. हि दिंडी वडवळ,जानवळ, कारेपुर,घाटनांदुर, अंबेजोगाई,पुस, खडीकेंद्र नेकणुर मार्गे सर्वधर्मियाचे श्रध्दास्थळ असलेल्या कपीलधार येथे पोहचणार आहे.

यावेळी जिल्हा सरचिटणीस संजयजी दोरवे, मंगेशजी पाटील, तालुकाध्यक्ष माधवजी बिरादार, बाजार समितीचे सभापती गोविंदजी चिलकुरे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथजी डोंगरे, जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वरजी चेवले, नगराध्यक्ष प्रतिनिधी रत्नजी शिवणे, सं.गा.यो. अध्यक्ष गणेशजी सलगरे, माजी सभापती धोंडिरमजी सांगवे, नगरसेवक ओमजी बरगे, नगरसेवक संदीपजी बिराजदार, सं.गा. यो. माजी अध्यक्ष अनिलजी शिंदे, संतोष शेटे,युवा मोर्चा शहराध्यक्ष ओमजी बिराजदार, युवा मोर्चा सरचिटणीस सागरजी मुरुडकर, शिवाजीरावजी कोरे, शंकरजी बेंबळगे, विरभद्र मुदाळे, माजी सरपंच नागनाथजी चलमले, माजी सरपंच हमीदजी पटेल, अनंत बोराळे, तानाजी फुलारी,आदी भाविक उपस्थित होते.

# शेतकरी नेते बच्चुभाऊ कडू यांच्या महाएल्गार मोर्चास शेतकरी पुत्रांचा पाठिंबा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** नागपूर येथे सुरू असलेल्या माजी आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली कर्जमाफी साठी सुरू असलेल्या शेतकरी महामोर्चासह सिल्लोड येथे शेतकरी व शेतकरी पुत्रांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. व तसेच सिल्लोड तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री साहेबांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटलं की शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा व सिल्लोड तालुक्यातील ओला दुष्काळ अनुदान तात्काळ देण्यात यावे व शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे. या मागणीसाठी शेतकरी व शेतकरी पुत्रांच्या वतीने सिल्लोड तहसीलदार साहेब यांच्यामार्फत. मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करत आहेत.

# घाटंजी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा मनमानी कारभार; जनतेचा वाढता आक्रोश

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि महेश पेन्दोर**




घाटंजी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचा मनमानी कारभार दिवसेंदिवस वाढत असून, सर्वसामान्य जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांनी दाखल केलेली अनेक प्रकरणे महिन्योनमहिने प्रलंबित राहतात, काही तर गायबच होतात, असा आरोप जनतेकडून करण्यात येत आहे.

नवीन रेशन कार्ड, नाव वाढविणे-कमी करणे, बाळाचे नाव चढविणे, अथवा दुय्यम प्रत तयार करणे अशा शासकीय कामांसाठी नागरिकांना तीन ते चार महिने नव्हे तर वर्षभर प्रतीक्षा करावी लागते. अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचे जनतेचे म्हणणे आहे.

जनतेच्या आरोपानुसार, दलालांमार्फत आलेली कामे मात्र तातडीने पूर्ण केली जातात. दलालांना कार्यालयात बसण्यासाठी खुर्ची उपलब्ध करून देण्यात येते, तर सामान्य नागरिकांना "सर्व्हर चालू नाही" असे कारण देऊन परत पाठवले जाते. लक्ष्मी धन (घूस) घेऊन काही कामे चुपचाप कार्यालयाबाहेर किंवा घरी केली जात असल्याचेही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

यामुळे शेतकरी व शेतमजूर वर्ग त्रस्त झाला आहे. आधीच दुष्काळ, महागाई आणि शेतीतील तोट्यामुळे बिकट परिस्थितीत असलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. "ज्यांच्याकडून पैसे घेतले जातात, त्यांची कामे झटपट; बाकीच्यांची फाइल्स गायब!" अशा शब्दांत जनतेने आपला आक्रोश व्यक्त केला आहे.

याशिवाय, डाटा एंट्री ऑपरेटर स्वतःच्या वैयक्तिक शेतीची कामे कार्यालयातच करत असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच काही शासकीय कामे घरून केल्याचेही आरोप जनतेने केले आहेत.

या सर्व प्रकारामुळे प्रश्न उपस्थित होतो "शासकीय कर्मचारी नेमके काम करतात कोणासाठी?" जनतेच्या तक्रारींची दखल घेऊन मा. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# सिल्लोड येथे महाआरोग्य तपासणी शिबिर संपन्न




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी MSACS मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग दिशा, जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजी नगर, प्रेरणा सामाजिक संस्था वैजापूर, संपूर्ण सुरक्षा केंद्र वैजापूर, व उपजिल्हा रुग्णालय सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमानाने शहरातील यशवंत नगर या झोपडपट्टी भागांत महा आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.

सदरील शबिरात नागरिकांची मोफत तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये आरोग्य व रक्त तसेच क्षयरोग, कुष्ठ रोग, कर्करोग यासारख्या तपासण्या मोफत करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन अब्दुल समीर यांनी याप्रसंगी केले. तर या शिबिरास उदंड प्रतिसाद मिळाला असून जवळपास 270 जणांची या शिबिरात आरोग्य तपासणी करण्यात आली असल्याची माहिती कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे यांनी दिली.

कार्यक्रमास युवासेनेचे शेख इमरान उर्फ गुड्डू, जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे, जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक संजय पवार, जिल्हा लेखापाल अनिरुद्ध काळे, सनियंत्रक मूल्यमापक संदीप तायडे ,वैद्यकीय अधिकारी डॉ. राम बोरकुल, डॉ. रामेश्वर फाळके, आशा नरवडे , वैशाली खंडाळे , विनोद राठोड ,गणेश तायडे, कविता खंबाट ,श्रीमती माया पाटील , मनीषा मुळे,प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी कदीर पठाण, नफीस अहमद , आयसीटीसी समुपदेशक मंगेश कांबळे , अनिल राठोड, जगदीश शिरसाट ,बंटी राजपूत,सोहेल शेख ,सुरेश लोखंडे, सुनील माने आदिंची उपस्थिती होती.

# दुग्ध उत्पादनाच्या माध्यमातून शेतक-यांनी आपला आर्थिक विकास साधावा : किशोर नारकर

**दैनिक युवक आधार**
**पाचल:-(प्रमोद तरळ)**



दुग्ध उत्पादन हा शेतीला पूरक व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसाय वाढीसाठी शासनाच्या अनेक चांगल्या योजना आहेत. या योजनांचा लाभ घेऊन आपण आपला आर्थिक विकास साधावा, असे आवाहन पाचल चे माजी उपसरपंच व पाचल गट विविध सहकारी सोसायटी चे संचालक किशोर नारकर यांनी बोलताना केले. पाचल गट सहकारी सोसायटी आणि गोकुळ दुध उत्पादक संघाच्यावतीने दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना बोनस चे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी शेतकऱ्यांना ७० हजार रुपये बोनसचे वाटप करण्यात आले. तसेच दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत दुध किटली व मिठाईचे वाटप करण्यात आले. ऐन दिवाळीच्या हंगामात व लक्ष्मी. पुजनाच्या दिवशीच बोनस चे वाटप करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे चेअरमन राजेंद्र सावंत, माजी चेअरमन राजन लब्दे, संचालक किशोर नारकर, धोंडीराम केलते, शांताराम साळवी, सचिव प्रशांत सुतार, दुध संकलन केंद्र प्रमुख गौतम जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# अंत्यसंस्काराला मिळणार मोफत लाकडे, नेरे ग्रामपंचायतचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नेरे ग्रामपंचायत हद्दीतील मृत पावलेल्या व्यक्तीच्या अंत्यसंस्काराला मोफत लाकडे देण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. नेरे ग्रामपंचायतच्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे.

कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर संपूर्ण कुटुंब दुःखात असते. यावेळी गावातील एखाद्या व्यक्तीला लाकडे आणि अन्य सामान आणण्याची जबाबदारी दिली जाते. अंत्यसंस्कारासाठी लाकडे विकत टेम्पोमधून आणावी लागतात. याबाबत नेरे ग्रामपंचायतने एक पाऊल पुढे टाकत दीड वर्षांपूर्वी अंत्यविधी करण्यासाठी लागणारे सामान मोफत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर 29 ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कारासाठी लागणारी लाकडे देखील मोफत देण्याचा निर्णय सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच राम पाटील, ग्रामसेविका राजश्री पाटील यांनी घेतला आहे. नेरे ग्रामपंचायत सदस्य शैलेश जाधव, तन्वी ठाकूर, सविता चोरघे, दिनेश मानकामे, कल्पना वाघे, नीलिमा पाटील, शैलेश पाटील, मनीषा गायकर, प्रगती फडके, वंदना रोडपालकर यांनी या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे. नेरे ग्रामपंचायतचा आदर्श घेऊन इतर ग्रामपंचायतीनी देखील असा उपक्रम राबवावा अशी मागणी केली जात आहे.

# पेण पोलीस स्टेशन मार्फत एकता दौडचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधी दीपक लोके**

भारताचे पहिले उपपंतप्रधान तथा गृह मंत्री पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दिडशेव्या जयंती निमित्त पुर्ण देशात राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जात असून, त्यानिमित्त पुर्ण देशात गृह खात्यामार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून पेण पोलीस स्टेशनमार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. हि दौड प्राप्त कार्यालय पेण येथून सुरू होउन धरमतर रोड मार्गे कोतवाल चौकात, कोतवाल चौकातून नरदास चाळ, पंकापाटील चौक, कयंडाळ तळा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते महाराजांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पहार घालुन पुढे, भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर चौकात दौड गेली. या चौकात डॉ. बाबा साहेबांच्या देखील अर्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्या नंतर महात्मा गांधी वाचनालयाच्या पटांगणावर या दौडचे रुपांतर छोटयाखाली सभेत झाले. यावेळी निवासी तहसिलदार प्रसाद कालेकर, यांनी प्रास्ताविक केले. भाजपचे महामंत्री वैकुंठ पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर खासदार धैर्यशील पाटील यांनी




देखील आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्र ीय एकता दिनाचे महत्त्व सांगितले. व यावेळी पोलीस निरिक्षक संदीप बागुल यांनी एकता दौडमध्ये शामिल झालेल्यांचे आभार मानले.

या एकता दौडमध्ये खासदार धैर्यशील पाटील, डी.वाय. एस.पी जालींदर नारकुंद, निवासी तहसिलदार प्रसाद कालेकर, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे तथा हरीओम, महामंत्री वैकुंठ पाटील, गटनेते अनिरुध्द पाटील, अॅड. मंगेश नेने, नगरसेविका सुनिता जोशी, नगरसेवक शोमेर पेणकर, नगरसेवक संतोष मंदा लक्ष्मण पाटील, मा. नगरसेवक जनार्दन जाधव, परशूराम पाटील, दिनेशशेठ पाटील, स्वप्निल म्हात्रे, प्रफुल्ल म्हात्रे, विवेक म्हात्रे, अमित पाटील, संदेश ठाकूर यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी व शांतता कमिटी सदस्य, दक्षता कमिती सदस्य, पोलीस पाटील, हेल्थ फिटनेक ग्रुपचे सदस्य, विद्यार्थी आणि पत्रकार शामिल झाले होते. शेवटी राष्ट्रगीताने या एकता दौडची सांगता करण्यात आली.

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## मुदखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी राजू भाऊ चौदंते यांनी केला अर्ज दाखल



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

येत्या नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रभाग क्र. २ मधून भावी नगरसेवक राजू भाऊ चौदंते यांनी काँग्रेस कमिटी, मुदखेड यांच्या कार्यालयात इच्छुक उमेदवार म्हणून अर्ज सादर केला. या वेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करताना उत्साही वातावरण पाहायला मिळाले.

राजू भाऊ चौदंते हे सामाजिक कार्यात अग्रेसर असून नागरिकांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. त्यांच्या अर्ज सादरीकरणानंतर परिसरातील नागरिकांत उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मरखेल पोलीस स्टेशन अंतर्गत राष्ट्रीय एकता दिवस तसेच रन फॉर युनिटी कार्यक्रम उत्साहात साजरा

### पोलिस उपनिरिक्षक रवींद्र हुंडेकर (एपीआय) यांच्या हाकेला अनेक मान्यवरांची, बालक,युवा वर्गांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे**

देगलूर(०१)हणेगाव येथे मरखेल पोलीस स्टेशनच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस व तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांनी आपल्या सहका-यांसोबत या विभागात या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार करून अनेकांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास विनंती केली आणि या विनंतीला अनेक सामाजिक कार्यकर्ते विविध क्षेत्रातील पदाधिकारी उद्योजक,व्यापारी,सामाजिक कार्यकर्ते,व युवा वर्ग तसेच बालक वर्ग उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला असून हणेगाव येथील वझर टी पॉइंट येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांना रवींद्र हुंडेकर यांनी राष्ट्रीय एकता दिवस व तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याविषयी माहिती दिली,तर कै.इंदिराबाई देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक संदिप चलवे यांनी पण उपस्थित मान्यवरांना मार्गदर्शन केले आणि सर्व लहान बालक मुले मुली व युवा वर्ग यांचे सह धावण्याची शर्यत ठेवण्यात आली.

या कार्यक्रमात प्रथम पारितोषिक द्वितीय,तृतीय आलेल्या छोट्या बालकांना युवा वर्गांना मरखेल पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मानपत्र देण्यात आले तर हणेगाव विभागातील सर्वच क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाला आवर्जून सर्व गावचे पोलीस पाटील उपस्थित होते तर कु.केशवी राजेश पंदरगे,अंजली अक्कमगिरे,यांनी प्रथम द्वितीय पारितोषिक मिळविले.

या कार्यक्रमाला विवेक पडकंठवार,दिलीप बंदखडके,डॉ. व्ही.व्ही.धुमाळे,मुक्तार पटेल, मौलाना सज्जाद खासमी,राजेश पंदरगे प्रा.प्रभाकर भालके, संजय काडगे,पुरुषोत्तम अन्सापुरे,प्राचार्य फुलसिंग राठोड,संतोष राठोड (ग्रामपंचायत सदस्य),वसंत आडेकर(ग्रामपंचायत सदस्य), पत्रकार मोसिन मुजावर, सौ.मनीषा संजय वसुरकर पोलीस पाटील,ज्योती गोखले पोलीस पाटील वझर,गजेंद्र पाटील लोणी,एकनाथ रेडी मरतोळी,तानाजी देवकते, कविता अशोक दोंगाले बीजलवाडी,सिंधुताई धर्मावाड येडूर,संदीप बाळासाहेब देशमुख शिळवणी आदीजण उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे आयोजन हणेगाव दूरपरिक्षेत्राचे जमादार दत्ता पाटील,नारायण यंगाले यांनी सुंदर असे नियोजन केले तर सर्व मान्यवरांच्या वतीने मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले.




## दौंड तालुक्यातील शिवसेना ठाकरे गटाकडून आगामी निवडणूकीसाठी पदाधिकाऱ्यांकडून रेटा

**दैनिक युवक आधार**
**सणसर:- विकास क्षत्रिय**

शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन भाऊ अहिर यांच्या सूचनेवरून गुरुवारी दौंड विधानसभा क्षेत्रामध्ये जिल्हाप्रमुख संजय भाऊ काळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येणाऱ्या पंचायत समिती जिल्हा परिषद नगरपरिषद निवडणुक अनुषंगाने मोठ्या उत्साहात बैठक संपन्न झाली



महाराष्ट्रामध्ये होऊ घातलेल्या पंचायत समिती जिल्हा परिषद नगरपालिका नगरपरिषद निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापत असताना पुणे जिल्ह्यातील दौंड विधानसभा क्षेत्रामध्ये पंचायत समिती आणि दौंड शहरांमध्ये शिवसेना ठाकरे पक्षाकडून जास्तीत जास्त उमेदवार उभा करून चांगल्या पद्धतीने निवडणूक लढण्याच्या नियोजनासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊस दौंड या ठिकाणी इच्छुकांनी गर्दी करत बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये राज्य संघटक श्री अतुलराजे नागरे यांच्या बरोबर व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे संपर्क करून उपस्थित पदाधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेमध्ये बळ देण्यासाठी उत्साह पूर्वक आश्वासन मिळाले आणि बैठकीचे वातावरण आनंददायी झाले

या बैठकीसाठी शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संजय काळे उपजिल्हाप्रमुख अनिल सोनवणे तालुकाप्रमुख शंकर शितोळे शहर प्रमुख आनंद पळसे आरोग्य सेनेचे तालुकाध्यक्ष डॉ प्रमोद रंधवे युवा सेनेचे किरण वाळुंजकर अमोल भागवत व इतर पदाधिकारी संतोष जगताप रमाकांत निवगुणे देविदास धुमाळ आमोळ काळे विक्रम इंगोले नामदेव राहिंज मच्छिंद्र ठोंबरे दीपक पाटील शिवाजी साळुंखे मंगेश वाघ दत्ता राऊत इतर शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

## पनवेल शहर पोलीस ठाणेचे वतीने एकता दौड संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

भारत रत्न सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दि.३१ ऑक्टोबर रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे च्या वतीने एकता दौड (RUN FOR UNITY) /WALK-ATHON चे वडाळा तलाव परिसर, पनवेल येथे आयोजन करण्यात आले होते.

एकता दौड वडाळे तलाव पोलीस चौकी या ठिकाणाहून सकाळी ०७ वाजता सुरू होऊन पुढे, व्ही. के.हायस्कूल, धूतपापेश्वर कॉर्नर, सावरकर चौक, नवीन कोर्ट, विरुपक्ष मंगल कार्यालय मार्गे वडाळे तलाव पोलीस चौकी या ठिकाणी संपन्न झाली .

एकता दौड करिता भाऊसाहेब ढोले, सहायक पोलीस आयुक्त पनवेल विभाग नवी मुंबई,नितीन ठाकरे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल शहर पोलीस ठाणे, पोनि अभिजीत अभंग, १० सपोनि, ६३ अंमलदार व ३०० ते ३५० नागरिक, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला



## "आमच्या जिल्ह्यातील दिवाळी अंक परंपरा"

### अभ्यासकांना लेखांसाठी आवाहन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (रवींद्र मालुसरे)**

:दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शनाचे सुवर्ण महोत्सवी (५० वे ) वर्ष साजरे जाणारी आमची मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई ही संस्था १९४९ पासून मुंबई-महाराष्ट्रात अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्थेच्या चळवळीचे ७६ वर्ष साजरे करीत आहे.

अमृततुल्य, संतांची, ज्ञानवंतांची, कीर्तिवंतांची, शूरांची, वीरांची, विजिगीषू अशी आपली मराठी मायभाषा ! १९०९ ला प्रकाशित झालेल्या मनोरंजन या पहिल्या दिवाळी अंकापासून आजपर्यंत अधिकाधिक समृद्ध झाली आहे. दरवर्षी दिवाळी सणाच्या निमित्ताने शेकडो दिवाळी अंक प्रकाशित होत आहेत. श्रीमंत




आणि समृद्ध असलेला हा मराठी साहित्याचा ठेवा अधिकाधिक मराठी भाषिकांसमोर घेऊन जाण्याचे आणि जपण्याचे जोपासण्याचे काम संपादक, प्रकाशक, साहित्यिक, वितरक, वाचक ११७ वर्षे अविरतपणे परिश्रमपूर्वक आवडीने करीत आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करताना संस्थेच्या वतीने गेल्या शतकभराचा आढावा घेत यावर्षी "दिवाळी अंक संस्कृती सूची ग्रंथ" प्रकाशित करीत आहोत.

हा ग्रंथ परिपूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रातील अभ्यासकांना "आमच्या जिल्ह्यातील दिवाळी अंक परंपरा" या नावाने १२०० शब्दात संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा-जिल्ह्यातून लेख लिहून chalval1949@gmail.com, मेलवर किंवा या 9323117704 व्हॅट्सऍपवर दिनांक ३० नोव्हेंबर पर्यंत पाठवावा असे आवाहन करण्यात येत आहे. अभ्यासपूर्ण आणि सर्वसमावेशक असलेल्या लेखांचा समावेश या ग्रंथात केला जाईल असे आवाहन संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी केले आहे.

## भारतीय एकात्मतेचे शिल्पकार: सरदार पटेल यांच्या150 व्या जयंती निमित्तानेउरण व मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने "राष्ट्रीय एकता दिवस"उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

ब्रिटीश राजवटीतून मुक्त झाल्यानंतर, 3 वर्षापूर्वी देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सर्वांनी साजरा केला. आज देशाच्या स्वतंत्र्याला 78 वर्षे पूर्ण होत असतानात स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीनुसार भारतदेश अनेक लहान-मोठ्या 560 हून अधिक संस्थानांमध्ये विखुरलेला होता. या संस्थानांना भारतीय संघराज्यात विलीन करण्याचे अत्यंत गुंतागुंतीचे कार्य भारत देशाचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी हे शिवधनुष्य पेलून, भारतांतील अनेक लहान-मोठ्या 560 हून अधिक संस्थानांमध्ये विखुरलेल्या या संस्थानांना भारतीय संघराज्यात विलीन करण्याचे अत्यंत गुंतागुंतीचे महानकार्य त्यांनीकेले म्हणूनच आज आपण सारे भारतीय एकसंघ एकदिलाने स्वतंत्र भारत देशाचे नागरिक म्हणून स्वाभीमाने जगत आहोत.

त्यामुळे प्रत्येक भरतीय साठी 31 ऑक्टोबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे कारण हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारताचे शिल्पकार,देशाचे पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती. आहे.त्यामुळे संपूर्ण देशभरात हा दिवस संपूर्ण देशात 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. एकता आणि अखंडता हे कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाचा आणि प्रगतीचा आधारस्तंभ आहे , हा संदेश या दिनाच्या माध्यमातून आपल्याला मिळतो.आज संपूर्ण देशभरात हा दिवस साजरा होत असतना उरण तालुकाही त्याला अपवाद नसून उरण आणि मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीचे औचित्य साधून उरण शहरांतून "एकता दौड रॅलीचे" आयोजन करण्यात आले होते.

एकता दौड पेन्शन पार्क, उरण या ठिकाणाहून सकाळी 07.30 वाजता सुरू होऊन पुढे स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळ्या समोरून गणपती चौक, राजपाल नाका मार्गाने पालवी हॉस्पिटल समोरून कामठा मार्गे NI हायस्कूल- पुन्हा स्वामी विवेकानंद चौक मार्गाने पेन्शन पार्क, उरण या ठिकाणी 08.15 संपन्न झाली, या एकता दौड करिता उरण पोलीस ठाण्याचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी साहेब, पो.नि संजय जोशी, 05 स.पो.नि/पो.उपनि, 45 अंमलदार तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे 02 स.पो.नि/ पो. उपनि, 20 अंमलदार व 200 ते 250 प्रतिष्ठित नागरिक, माजी नगरसेवक, पोलीस पाटील, सागर रक्षक दल सदस्य, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

> प्रत्येक भारतीयासाठी 31 ऑक्टोबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हा दिवस म्हणजे स्वतंत्र भारताचे शिल्पकार, पहिले उपपंतप्रधान तथा गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आहे. त्यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून, हा दिवस संपूर्ण देशात 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा केला जातो. एकता आणि अखंडता हे कोणत्याही राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि प्रगतीचे आधारस्तंभ आहेत त्यांच्या स्मृतिदिनी, आपण सर्व भारतीयांनी, त्यांनी पाहिलेल्या अखंड आणि मजबूत भारताचे स्वप्न साकार करण्याची प्रतिज्ञा करावी. देशाची एकता आणि अखंडता जपण्यासाठी सदैव तत्पर राहणे, हीच 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी आदरांजली ठरेल.

## पनवेल पालिकेत पुन्हा भरती प्रक्रिया; १३४ रिक्त पदांसाठी नव्याने परीक्षा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

> पनवेल महापालिकेने ३७७ पदांसाठी सरळ सेवेमार्फत परीक्षा घेतली त्या काळात राज्य सरकारच्या विविध परीक्षा सुरू होत्या, अनेक उमेदवारानी इतर विभागांच्या भरती प्रक्रियेतही सहभाग घेतल्याने काहींची निवड एकापेक्षा अधिक ठिकाणी झाली, त्यापैकी अनेकांनी आपल्या राहत्या परिसराच्या जवळील नोकरीला प्राधान्य दिल्यामुळे पनवेल महापालिकेतील निवड झाल्यानंतर त्यांनी रुजू होणे टाळले. त्यामुळे आयुक्तांच्या निर्देशानुसार आता रिक्त पदासाठी पुनश्च भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
> - कैलास गावडे, उपायुक्त, पनवेल महापालिका

**सर्वाधिक लिपिक-टंकलेखक पदे**

पनवेल महापालिकेतील १३४ रिक्त पदांसाठी लवकरच पुन्हा भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सप्टेंबर महिन्यात शासनाकडे भरती प्रक्रियेला मुदतवाढ मिळावी, यासाठी महापालिकेने पाठविलेला प्रस्ताव तांत्रिक कारणामुळे मागे घेण्यात आला असून आता पुन्हा टीसीएस कंपनीमार्फत नव्याने भरती प्रक्रिया सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

पनवेल महानगरपालिकेमध्ये १३४ पदे रिक्त असल्याने प्रशासनाने या पदांसाठी नव्याने भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या पनवेल महापालिकेत एकूण १३२६ कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी ८२५ जण महापालिका आस्थापनातील अधिकारी आणि कर्मचारी असून ६७ जण हे शिक्षक आहेत. २०२३ साली टीसीएस कंपनीमार्फत ३७७पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली होती. मात्र काही उमेदवारांनी इतर संस्थांमध्ये रुजू झाल्याने १३४ पदे पुन्हा रिक्त राहिली. सप्टेंबर महिन्यात महापालिकेने शासनाकडे या भरती प्रक्रियेला मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव पाठविला होता. मात्र, तांत्रिक कारणामुळे तो प्रस्ताव अमान्य ठरण्याची शक्यता निर्माण झाल्याने महापालिकेने तो प्रस्ताव मागे घेतला आहे. परिणामी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले असून, आता या पदांसाठी पुन्हा परीक्षा घेऊन भरती प्रक्रिया पार पडणार आहे. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी सामान्य प्रशासन विभागाला निर्देश दिले असून, नव्याने प्रक्रिया राबविण्यासाठी टीसीएस कंपनीकडून लागणाऱ्या खर्चाचा सविस्तर तपशील मागविण्यात आला आहे. या हालचालीमुळे महापालिकेतील सुमारे १३४ पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.या पार्श्वभूमीवर नव्या भरती प्रक्रियेच्या तयारीला वेग आला असून, लवकरच पनवेल महापालिकेकडून जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. यामुळे स्थानिक तरुणांसाठी पुन्हा एकदा रोजगाराची नवी संधी उपलब्ध होणार आहे.या रिक्त पदांपैकी सर्वाधिक म्हणजे ७६ पदे ही लिपिक-टंकलेखक या संवर्गातील आहेत. त्याशिवाय कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत, हार्डवेअर-नेटवर्किंग), वैद्यकीय अधिकारी, हिवताप अधिकारी, परिचारिका, अग्निशमन दलातील कर्मचारी, वाहनचालक, माळी, सहाय्यक क्रीडा अधिकारी, तसेच विविध लघुलेखक पदेही रिक्त आहेत.

## खारघर मध्ये बेवारस मृतदेह सापडला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

सायन पनवेल महामार्ग कोपरा ब्रिज खाली प्रवीण बाविस्कर यांनी फुटपाथवर एक अनोळखी इसम नीपचीत पडलेल्या अवस्थेत असल्याची माहिती खारघर पोलिसांना दिली. या अनोळखी इसमाला पोलिसांनी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलीस या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

मृत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ वर्ष असून, रंग गोरा, उंची ५ फूट, मध्यम बांधा, केस काळे, दाढी वाढलेली, नाक सरळ, चेहरा गोल, अंगात निळ्या रंगाचा टी-शर्ट व निळ्या रंगाची फुल पॅन्ट परिधान केलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. सदर मृत व्यक्तीसंबंधी अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे सहाय्यक पोलीस निरी. रत्ना खंडेलवाल यांच्याशी संपर्क साधावा.

## मिरजगाव पोलीस स्टेशन तर्फे रन फॉर युनिटी चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मिरजगाव प्रतिनिधी सतीश शिंदे**

पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर आयोजित लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त मिरजगाव पोलीस स्टेशन चे एपीआय श्री विजय झंजाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमासाठी मिरजगाव आणि परिसरातील युवक तसेच विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवला यातील विशेष आकर्षण म्हणजे साठ वर्षीय केदारी तात्या यांनीही या एकता दौंडमध्ये सहभाग नोंदवला तर प्रास्ताविकात पोलीस स्टेशनचे एपीआय श्री झंजाड साहेब म्हणाले ज्याप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल यांनी अखंड हिंदुस्तान एकत्र केला त्याप्रमाणे आपण सर्वांनी एकत्र येऊन गुण्या गोविंदाने राहिले पाहिजे हम सब एक है या भावनेने सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले, तर कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा भाजपा नेते आणि भावी जिल्हा परिषद सदस्य संपतरावजी बावडकर यांनी सांगितले की भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर हैदराबाद स्टेट जुनागड




संस्थान काश्मीर संस्थान अशी काही संस्थाने अखंड भारतात विलीन होत नव्हती तेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांनी ऑपरेशन पोलो अंतर्गत ज्या कारवाया केल्या त्यामुळे ही सर्व संस्थाने भारतात विलीन झाली आज जो आपणास अखंड भारत दिसत आहे त्याचे श्रेय नक्कीच सरदार वल्लभ वल्लभभाई पटेल यांना जाते, माजी पंचायत समिती सदस्य डॉक्टर पंढरीनाथ आबा गोरे मिरज गावचे माजी सरपंच सारंग घोडेस्वार, केदारी तात्या, पोलीस कॉन्स्टेबल सुनील खैरे, श्री गोरदे, श्री दहिफळे, श्री माळशिकारे, राहुल सपट इत्यादी पोलीस कर्मचारी बांधव उपस्थित होते क्रांती चौक मिरजगाव येथून सुरू झालेली ही दौड सुमारे पाच किलोमीटर अंतरावर जाऊन थांबली आणि तेथे या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमास सर्व उपस्थित यांचे पोलीस स्टेशनच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले

## रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात मनसे मध्ये जोरदार इनकमिंग सुरू



**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके**

हिंदू जननायक सन्माननीय राज जिल्ह्यातील साहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन व मनसे नेते अमित ठाकरे तुमच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात महाराष्ट्र न्यूज मध्ये जोरदार इन्कमिंग सुरू झाली असून रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदीपदादा ठाकूर आणि पेण तालुका महिला अध्यक्ष सौ गौरी ताई व्होरा-पाटील यांच्या नेतृत्वाखाली बोरगांव पेण ग्रामपंचायत सदस्या सौ सीताताई रमेश वाघमारे तसेच श्री रमेश वाघमारे, नित्या रोडेकर, नयन रोडेकर व राकेश पाटील यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेने मध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी पेण तालुका अध्यक्ष श्री मनोहर पाटील, पेण तालुका उपाध्यक्ष नितेश पाटील,पंकज पाटील,विजय पाटील,सौरभ पाटील,प्रसाद पाटील, हमरापुर विभाग अध्यक्ष नमस्कार भगत,जिते विभाग अध्यक्ष विवेक घरत,वाशी विभाग अध्यक्ष सुहास पवार,पेण तालुका संघटक (रोजगार विभाग)धवल पौडवाल,रजनी नागे,सुजाता टक्के,नित्या रोडेकर व सर्व महाराष्ट्र नवनिर्माण सैनिक उपस्थित होते.

# रिसोड येथे शिवसेनेची(ऊ. बा.ठा.) आढाव बैठक

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह ठाकूर**



रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाची आढावा बैठक वाशिम जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाचे वाशिम जिल्हासंपर्कप्रमुख दिलीप जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व संपर्कप्रमुख सुधीर कव्हर, जिल्हाप्रमुख सुरेश मापारी, रिसोड विधानसभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, उपजिल्हाप्रमुख डॉ. चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड येथील मालेगाव नाकास्थीत विश्वा लॉन मधील शिवसेना कार्यालयामध्ये आयोजित केली आहे.होणाऱ्या जिल्हा परिषद , पंचायत समिती,नगर परिषद निवडणुकी संदर्भात तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण आणि नगरपरिषद निवडणूक आढावा बैठक घेण्यात येणार आहे तरी रिसोड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसेना युवा सेना महिला आघाडी, आणि आजी-माजी सर्व पदाधिकारी, तालुका समन्वयक, तालुका संघटक, उप तालुका संघटक, उपतालुकाप्रमुख, सर्कल प्रमुख, शाखाप्रमुख,इच्छुक उमेदवार व त्यांना सहकार्य करणारे सर्व कार्यकर्ते, शिवसैनिक यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ ला सकाळी १० वा.३० मी. उपस्थित राहावे असे आवाहन रिसोड शिवसेना तालुकाप्रमुख नारायण आरु यांनी केले आहे.

# विधान भवनात बैठकीत डाऊर कुटुंबीयांच्या बाजुने सकारात्मक निर्णय ''दुधका दुध पानी का पानी'

**दैनिक युवक आधार/ महाराष्ट्र प्रतिनिधी**

करंजा गावात गेल्या काही महिन्या पासून डाऊर कुटुंबीयांच्या मालकीहक्क असलेल्या जमीनमधून कोणत्याच प्रकारे भूसंपादन न करता अथवा मोबदला न देता जबरदस्तींने डाऊर कुटुंबीयांच्या खाजगी जमीनमधून 20 फुट रस्ता तयार करून त्या रस्त्यावरून ॲफकॉन कंपनीकडून करंजा-रेवस सेतू करिता लागणाऱ्या अवजड सामानची वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक राजरोस पणे सुरू आहे. त्याच प्रमाणे करंजा मच्छीमार बंदरातून मच्छिवहातूक करणाऱ्या कंटेनरट्रेलर, डिझेल, बर्फाच्या गाड्यांची वाहतूक राजरोस पणे सुरू आहे.सदरची जागाही डाऊर कुटुंबियांच्या मालकीची असून डाऊर कुटुंबीयांनी द्रोणागिरी मातेच्या मंदिरात भाविकांना जाण्यासाठी रस्ता म्हणून उपलब्ध करून दिली होती.मात्र या जमिनीचा कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता जबरदस्तीने पोलीस बळाचा--- वापर करून डाऊर कुटुंबियांच्या खाजगी जमिनी हीं रहदारी राजरोस पणेसुरु आहे.अखेर स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतलेल्या डाऊर कुटुंबियांच्या वारसांनी सनदशीर मार्गाने लढा देत विधानभवनाचा दरवाजा ठोठावला यासंदर्भात दि 29 ऑक्टोबर2025 रोजी विधानसभा उपाध्यक्ष श्री. आण्णा बनसोडे यांच्या दालनात डाऊर कुटुंबियांच्या न्यायहक्कासठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, या बैठकीत डाऊर कुटुंबियांच्या बाजूने सकारात्मक निर्णय झाला असल्याने करंजा ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



आज विधानसभेत विधानसभा उपाध्यक्ष श्री.अणा बनसोडे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सुनावणी करीता पनवेल चे उपस्थित विभागीय अधिकारी श्री.पवन चांडक मेरिटाइम विभागाचे श्री.मेटकर उरण पोलीस स्टेशनचे श्री. जोशी ॲफकॉन कंपनी चे श्र. कोरे, डाऊर कुटुंबीयांकडून जेष्ठ वकील ॲड.प्रियदर्शनी म्हात्रे, चाणजे ग्रामपंचायत सरपंच श्री. अजय म्हात्रे. उरण पंचायत समिती मा. सभापती. ॲड. श्री. सागर कडू आणि डाऊर कुटुंबीय उपस्थितीत होते.सदर सुनावणीत कस्टम चाळ ते द्रोणागिरी मंदीर मार्गावर असलेली जमीन डाऊर कुटुंबीयांच्या मालकीहक्काची असल्याचं आणि सदर जमीनीचं कोणत्याच प्रकारचं संपादन अथवा त्या जमीनीचा कोणत्याच प्रकारचा मोबदला देण्यात आला नसल्याचं उपविभागीय आधिकारी श्री.पवन चांडक यांनी मान्य केलं. यासंदर्भात विधान सभा उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे यांनी संबंधित आधिकरी वर्गाला विचारले कि सदर जमीन डाऊर कुटुंबीयांच्या मालकीहक्काची असताना आणि त्या कुटुंबीयांकडून करंजा गावातील नागरिकांकरीता आणि परीसरातील द्रोणागिरी मातेच्या दर्शना करिता येणाऱ्या भाविकां करीता चांगल्या हेतूने दिली असताना डाऊर कुटुंबियांच्या खाजगी मालमत्ता आपण व्यवसायिक कामाकरिता तिचा वापर करीत असताना डाऊर कुटुंबीयांना पोलीस विभागाकडून कारवाई कोणत्या प्रकारेकोणत्या नियमाला अनुसरून करत आहात असे संबंधित आधिकरी वर्गाला खडसावून सांगण्यात आले.

तसेच येत्या आठ दिवसांत रेवस करंजा ब्रिज तसेच करंजा मच्छिमार बंदरात येणाऱ्या अवजड वहातूकी करिता पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्यात यावी आणि डाऊर कुटुंबीयांच्या मालकीहक्क असलेल्या जमीनमधून अवजड वहातूक त्वरित बंद करण्यात यावी अशी सक्त ताकीद विधान सभा उपाध्यक्ष श्री.अण्णा बनसोडे यांनी संबंधित आधिकारी वर्गाला दिली आहे. विधानसभा उपाध्यक्ष श्री.अण्णा बनसोडे यांनी उपविभागीय आधिकारी यांना दिनांक 6 नोव्हेंबर 2025 गुरुवार रोजी सदरील जागेवर जाऊन पहाणी करून सदर करंजा रेवस ब्रिज करीता अवजड वाहतूकी करीता पर्यायी मार्गाची पहाणी करण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत.

# "रायगडचा शेतकरी संकटात!

## अवकाळी पावसाने मोडला कोकणातील मेहनतीचा कणा

**दैनिक युवक आधार**
**(म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ**

रायगड जिल्हाततढच, मे महिन्यापासून सुरू झालेला आणि अजूनही थांबण्याचे नाव न घेणारा पाऊस कोकणातील शेतकऱ्यांसाठी अभिशाप ठरला आहे. भातशेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या रायगड आणि आसपासच्या कोकण पट्ट्यातील शेतकरी यंदा अक्षरशः हतबल झाले आहेत. कापणीस आलेला भात अवकाळी पावसामुळे संपूर्ण भिजला असून काही ठिकाणी कापलेले पीक पूर्णपणे कुजले आहे. या अनिश्चित पावसाने शेतकऱ्यांचा वर्षभराचा मेहनतीचा उध्वस्त केल्याचे चित्र दिसून येत आहे.



**शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान — मनोबल खचले**

रायगड, म्हसळा, मंडणगड, श्रीवर्धन, पोलादपूर या भागांमध्ये भातशेती हे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. मात्र सततच्या पावसामुळे जमिनी ओलसर राहिल्याने कापणी आणि वखारात साठवण या दोन्ही प्रक्रिया विस्कळीत झाल्या आहेत. अनेक शेतकऱ्यांचा कापलेला भात पाण्यात भिजून खराब झाला आहे. काही ठिकाणी उभे पीकच कोसळल्याने शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या मार्गावर आहेत.

"आम्ही वर्षभर घाम गाळून शेती केली, आता हातात काहीच उरलं नाही. सरकारकडून पंचनामे झाले तरी मदत कधी मिळेल याची खात्री नाही," असे एका म्हसळ्यातील शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

**सरकारकडे तातडीच्या मदतीची मागणी**

राज्य सरकारने नुकसानग्रस्त भागात पंचनामे सुरू केले असले तरी ते अपुरे असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी, कर्जमाफीसाठी आणि बी-बियाणे तसेच खत अनुदानासाठी तातडीने निधी जाहीर करावा, अशी मागणी कोकणातील शेतकरीकडून होत आहे.

**कोकणचा शेतकरी अजूनही लढतो आहे**

कोकणातील शेतकरी हा स्वाभिमानी आणि लढवय्या आहे. पिकांचे नुकसान झाले तरी तो आशा न सोडता पुन्हा शेतीत राबतोय. मात्र त्याची सहनशक्ती संपत चालल्याचे दृश्य सर्वत्र पाहायला मिळत आहे. "आमचं जगणं शेतीवरच आहे, पण दरवर्षी असा पाऊस आला तर शेती करणे अशक्य होईल," अशी वेदना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# कै.बाबुरावजी काळे स्कूलचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश !



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव : जिल्हा क्रीडा** अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत कै. बाबुरावजी काळे स्कूलच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.तसेच ३१ ऑक्टोबर रोजी संभाजीनगर येथे झालेल्या अथेलेटिक्स स्पर्धामध्ये १०० मीटर रनिंग मध्ये कै बाबुरावजी काळे मराठी स्कूलच्या प्रथमेश मिसाळ याने चौदा वर्ष गटात दुसरा क्रमांक तर १७ वर्ष वयोगट ४x१०० रिले स्पर्धेत हर्षल शिनकर,विराज राऊत,तुषार बोडखे, भावेश खैरनार यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अधक्षा ज्योतीताई काळे,सचिव देवीनाताई काळे-भटकर,संचालक शिवदीप काळे,सौ.सुनयना काळे, मुख्याध्यापक निलेश पाटील,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश यादव,प्रा.कमलेश काळे, उपमुख्याध्यापक प्रा.ज्ञानेश्वर एलिस,

प्रा.योगेश काळे,पर्यवेक्षक सागर घाटे, क्रीडाप्रेमी महेश मानकर,शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.हे विद्यार्थी आता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्या. पालोद येथील शेतकऱ्यांची मागणी



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथे दिनांक 27, 28 व 29 ऑक्टोबर रोजी गावात व शेती परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी पूर्णतः हवालदील झाला आहे. शेतकऱ्यांकडे कोणताही पर्याय राहिलेला नसून त्यासाठी शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची मागणी पालोद येथील शेतकऱ्यांनी माननीय तहसीलदार साहेब सिल्लोड यांना निवेदन देऊन करण्यात आली.

यावेळी पालोद येथील उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, बनेखा पठाण, विष्णू दांडगे, नारायण पालोदकर, विजयानंद दांडगे, संतोष दांडगे, तुषार पालोदकर, सिद्धार्थ सूर्यवंशी, सिद्धार्थ दांडगे, प्रभाकर काटकर, समाधान पालोदकर, राजेंद्र पालोदकर, समाधान सपकाळ, दादाराव लांडगे, संदीप पालोदकर, गजानन दांडगे आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी असलेले निवेदन मा.तहसिलदार साहेब यांना सादर करण्यात आले.

# प्रभू बाय्हणे संयांना तिकीट मिळावे – सामान्य जनतेतून वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक राजू शिंदे.**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकणी वडीगोद्री जिल्हा परिषद गण मधून शिवसेना (उबाठा) पक्षाने युवा नेतृत्व यांना पक्षाने तिकीट द्यावे व त्यांना जिल्हा परिषद सर्कल निवडूण येण्याची क्षमता आहे, अशी भावना सामान्य जनतेतून व्यक्त होत आहे. श्री. प्रभू बाम्हणे यांनी गेल्या काही वर्षांत केलेल्या प्रामाणिक व जनतेसाठी कामामुळे त्यांच्याविषयी विश्वास व आपुलकी निर्माण झाली आहे.



शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच समाजातील सर्व घटकांचे प्रश्न सोडवण्यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. प्रत्येक समस्येकडे समर्पितपणे पाहून त्यावर योग्य तोडगा काढण्याचा त्यांचा प्रयत्न लोकांना आश्वस्त करणारा ठरला आहे. त्यामुळे "संतोष खारवणे यांनाच तिकीट मिळावे, त्यांनाच निवडून आणावे" अशी मागणी गावोगावी ऐकायला मिळते.जनतेमध्ये वाढत्या चर्चांमुळे संतोष खारवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला जात असून, ते पुन्हा एकदा मतदारांचा विश्वास संपादन करून पुढे येतील, असा आशावाद सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# "मोहल्ला फिल्म" प्रकरणात आर्थिक फसवणूक उघड — १३ कामगारांचे मानधन थकित!

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,मुंबई विभाग प्रमुख**

"मोहल्ला फिल्म" या चित्रपटाच्या निर्मात्यांनी कामगारांचे मानधन न दिल्याने आर्थिक फसवणुकीचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. कामगार धर्मेंद्र कुमार शाह (गोरेगाव, मुंबई) यांनी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनकडे दिलेल्या लेखी तक्रारीत हा प्रकार समोर आला आहे.

धर्मेंद्र शाह यांच्या निवेदनानुसार, १० एप्रिल २०२४ रोजी ते संपूर्ण टीमसह — मेकअप, लाईट, स्पॉट, फूड, ड्रायव्हर, कॅमेरा, ड्रेस आदी विभागातील एकूण १३ कामगारांसह भोपाल येथे शूटिंगसाठी गेले होते. पाच दिवसांचे शूट पूर्ण करून मुंबईत परतल्यावर निर्मात्यांनी राहण्याचे, प्रवासाचे तसेच मानधनाचे पैसे देण्यास टाळाटाळ केली.काहींना दिलेले चेक अपुऱ्या निधीमुळे बँकेतून बाउन्स झाल्याचीही माहिती मिळाली आहे.या प्रकरणात संबंधित निर्माते नरेंद्रनाथ मोहल्ला आणि




त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. धर्मेंद्र शाह यांच्यासह इतर तंत्रज्ञांनी अन्यायाविरोधात संताप व्यक्त केला आहे. "शेकडो तंत्रज्ञांचे श्रम वाया गेले; काम करूनही पैसे न मिळणे ही कामगारांची दुर्दशा आहे. युनियन अशा प्रकरणांकडे गंभीरतेने पाहत असून, संबंधितांविरुद्ध चौकशी सुरू करण्यासाठी पोलिसांकडे तक्रार पाठवली आहे." अजित म्हामुणकर, ऑल इंडिया प्रेसिडेंट, दादासाहेब फाळके चित्रपट युनियन "दादासाहेब फाळके चित्रपट युनियनकडून आलेली तक्रार आम्हाला प्राप्त झाली असून, तपासासाठी संबंधित कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल."

# एकता दौड : निफाड, लासलगाव, पिंपळगाव आणि सायखेडा पोलिस ठाण्यांतर्फे 'राष्ट्रीय एकता दिवस' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त निफाड पोलीस स्टेशन अंतर्गत "एकता दौड" या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण बाळासाहेब पाटील तसेच अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

निफाड उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक कांतीलाल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या अध्यक्षतेखाली मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. दौडीची सुरुवात निफाड पोलीस स्टेशन येथून उगाव रोडकडे करण्यात आली.

या एकता दौडीत डॉक्टर असोसिएशन, स्विमिंग ग्रुप, सायकलिंग ग्रुप, पत्रकार, नगर




पंचायत अध्यक्ष, नगरसेवक, कृषी उत्पन्न बाजार समिती, व्यापारी वर्ग, शासकीय अधिकारी-कर्मचारी, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विविध सामाजिक व धार्मिक मंडळाचे सदस्य यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागरिकांनी व विविध संस्थांनी पोलीस विभागास सहकार्य केले. विजेत्यांना सर्टिफिकेट, ट्रॉफी व हारगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

लासलगाव, पिंपळगाव आणि सायखेडा पोलीस स्टेशन अंतर्गतही एकता दौड उत्साहात पार पडली.पिंपळगाव पोलीस स्टेशनचे पीआय प्रदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मॅरेथॉन यशस्वीरीत्या पार पडली. लासलगाव पोलीस स्टेशनचे एपीआय भास्करराव शिंदे यांच्या देखरेखीखालीही दौड उत्साहात संपन्न झाली.

सायखेडा पोलीस स्टेशनचे एपीआय विकास यांच्या उपस्थितीत सायखेडा येथील मॅरेथॉन सुव्यवस्थितरीत्या पार पडली.या उपक्रमाद्वारे "राष्ट्रीय एकता"चा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला.नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या प्रेरणेतून आयोजित या कार्यक्रमाबद्दल निफाड पोलीस स्टेशनतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# आखाडा बाळापुर येथे, सरपंच चषक मॅरेथॉन स्पर्धा 6 नोव्हेंबर ला होणार

## प्रशासकीय अधिकारी यांचे हस्ते होणार थाटात उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**विजय खुडे कळमनुरी प्रतिनिधी**

सरपंच संघटनेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासुन सरपंच चषक मेरॅथॉन स्पर्धा आयोजित केली जाते त्या अनुषंघाणे येणाऱ्या 6 नोव्हेंबरला मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. यामध्ये 19. वर्षाखालील मुल आणि मुली सहभाग घेवु शकतात. मुलीसाठी ३ कि.मी तर मुलासाठी 5 कि. मी. असे अंतर ठेवले आहेत आणि यामध्ये प्रथम, द्वीतीय,तृतीय देण्यात येणार आहेत कार्यक्रमाला उदघाटक म्हणून तहसिलदार कळमनुरी, आदिवासी प्रकल्प आधिकारी, पोलीस निरिक्षण आखाडा बाळापुर, जिल्हा क्रीडा अधिकारी उपस्थित राहणार आहेत खेळाच्या माध्यमातुन युवकाचा विकास व्हावा यामुळे सदर आयोजन केले जाते यामध्ये युवकांचा भरगोस प्रतिसाद मिळत असते सदर कार्यक्रमाचे आयोजन सरपंच संघटना आणि पदाधिकारी असतात.

> आखाडा बाळापुर परिसरातील येथे होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने युवकांनी उपस्थित राहावे आणि खेळाच्या माध्यमातून आपले करिअर घडवावे.
> नामदेव रणवीर सर




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मिरजगाव पोलीस स्टेशन तर्फे रन फॉर युनिटी चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मिरजगाव प्रतिनिधी**
**सतीश शिंदे**

पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर आयोजित लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त मिरजगाव पोलीस स्टेशन चे एपीआय श्री विजय झंजाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमासाठी मिरजगाव आणि परिसरातील युवक तसेच विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवला यातील विशेष आकर्षण म्हणजे साठ वर्षीय केदारी तात्या यांनीही या एकता दौडमध्ये सहभाग नोंदवला तर प्रास्ताविकात पोलीस स्टेशनचे एपीआय श्री झंजाड साहेब म्हणाले ज्याप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल यांनी अखंड हिंदुस्तान एकत्र केला त्याप्रमाणे आपण सर्वांनी



एकत्र येऊन गुण्या गोविंदाने राहिले पाहिजे हम सब एक है या भावनेने सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले, तर कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा भाजपा नेते आणि भावी जिल्हा परिषद सदस्य संपतरावजी बावडकर यांनी सांगितले की भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर हैदराबाद स्टेट जुनागड संस्थान काश्मीर संस्थान अशी काही संस्थाने अखंड भारतात विलीन होत नव्हती तेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांनी ऑपरेशन पोलो अंतर्गत ज्या कारवाया केल्या त्यामुळे ही सर्व संस्थाने भारतात विलीन झाली आज जो आपणास अखंड भारत दिसत आहे त्याचे श्रेय नक्कीच सरदार वल्लभ वल्लभभाई पटेल यांना जाते, माजी पंचायत समिती सदस्य डॉक्टर पंढरीनाथ आबा गोरे मिरज गावचे माजी सरपंच सारंग घोडेस्वार, केदारी तात्या, पोलीस कॉन्स्टेबल सुनील खैरे, श्री गोरदे, श्री दहिफळे, श्री माळशिकारे, राहुल सपट इत्यादी पोलीस कर्मचारी बांधव उपस्थित होते क्रांती चौक मिरजगाव येथून सुरू झालेली ही दौड सुमारे पाच किलोमीटर अंतरावर जाऊन थांबली आणि तेथे या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमास सर्व उपस्थित यांचे पोलीस स्टेशनच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले

# गायत्री नगरवासीयांचे मालकी हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार!

## ३१ ऑक्टोबर रोजी मा. ना. मेघना दिदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते पी.टी.आर. वाटप

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी सेलू (ग्रामीण)**

गेल्या ४० वर्षांपासून सेलू येथील गायत्री नगरमधील रहिवाशांचा पी.टी.आर. चा प्रश्न प्रलंबित होता. येथील नागरिकांनी प्रत्येक राज्यकर्त्यांकडे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी मागण्या केल्या, निवेदने दिली, आंदोलने केली; परंतु त्यांच्या लढ्याला यश आले नाही. परिणामी पात्रता असतानाही नागरिकांना 'घरकुल' सारख्या योजनांचा लाभ घेता आला नाही.

हा प्रश्न आम्ही गायत्री नगर येथील शिष्टमंडळाला सोबत घेऊन परभणी जिल्ह्याचे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार मा. रामप्रसादजी



बोर्डीकर साहेब आणि राज्याच्या राज्यमंत्री तसेच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. मेघना दिदी साकोरे बोर्डीकर यांच्या समोर मांडला.

मा. मेघना दिदींनी शिष्टमंडळाला सन्मानपूर्वक वागणूक देत आपुलकीने विषय समजून घेतला आणि म्हणाल्या –"पंडित दिनदयाल उपाध्याय यांची 'अंत्योदय' ही संकल्पना देशात आपल्या पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी आणि राज्यात लोकप्रिय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस साहेब सत्यात उतरवत आहेत. तीच संधी मला सेलू येथील गायत्री नगरवासीयांच्या कामात मिळत आहे. मी यापूर्वी अनेक मोठे प्रकल्प आणले आहेत आणि पुढेही आणणार आहे, परंतु गायत्री नगरमधील श्रमिक कष्टकरी नागरिकांच्या चेहऱ्यावर पी.टी.आर. मिळाल्यानंतर उमटणारे स्वप्नपूर्तीचे हसू — हेच माझ्यासाठी सर्वात मोठे समाधान आणि आशिर्वाद ठरणार आहे!"

यानंतर मेघना दिदींनी तत्काळ संबंधित यंत्रणेला आदेश देऊन कमीतकमी वेळात गायत्री नगरवासीयांना त्यांच्या मालकीहक्काचा पी.टी.आर. देण्याची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले.सेलू नगर परिषदेचे मुख्याधिकारी मा. तुकारामजी कदम यांनी ही प्रक्रिया जलदगतीने पूर्ण केली आणि अखेर मुहूर्त ठरला!

येत्या शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पालकमंत्री मा. ना. मेघना दिदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते गायत्री नगरवासीयांना पी.टी. आर. चे वितरण करण्यात आले आहे.चाळीस वर्षांनंतर गायत्री नगरवासीयांसाठी ही खऱ्या अर्थाने दीपावलीची अनमोल भेट ठरली आहे!मा. ना. मेघना दिदी साकोरे बोर्डीकर आणि मा. साहेबांचे मनःपूर्वक आभार!

यावेळी सेलू नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री तुकारामजी कदम, भारतीय जनता पक्षाचे सेलू शहराध्यक्ष श्री अशोक शेलार, श्री गणेश सवणे, विनोद बोराडे, अशोक नाना काकडे, अशोक अंभोरे, मनीष कदम, गणेश काटकर, मार्केट कमिटीचे सभापती संजयजी रोडगे, तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वाढत्या घनकचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कार्यवाही करा - आ. प्रशांत ठाकूर यांची सिडकोकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल तालुक्यातील वाढत्या घनकचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल परिसरातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या तीव्र होऊ नये या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना दिलेल्या निवेदनात तत्काळ उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे कि, पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतीपैकी १० पेक्षा जास्त ग्रामपंचायती या सिडको अधिसूचित क्षेत्रात व ४० पेक्षा जास्त ग्रामपंचायती नैना अधिसूचित क्षेत्रात आहेत. नियोजन प्राधिकरणामार्फत विविध बांधकामांना परवानगी



देते वेळेस विकास शुल्काची आकारणी करण्यात येते. तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनची खात्री केल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते. सिडको व नैना या नियोजन प्राधिकारणाकडील विविध विकास कामांमुळे अधिसूचित क्षेत्रातील निवासी, औद्योगिक व वाणिज्यक आस्थापनांची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अधिसूचित क्षेत्रातील वाढत्या विकास कामांमुळे पर्यायाने नागरी लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. तसेच, दैनंदिन रोजगारासाठी स्थलांतरित होणारी संख्या ही जास्त आहे. त्यामुळे अधिसूचित क्षेत्रातील निवासी, वाणिज्यक, व औद्यागिक आस्थापनांकडून होणारी कचरा निर्मिती ही प्रचंड आहे. सबब, अधिसूचित क्षेत्रातील ग्रामीण हद्दीमध्ये कच-याचे व्यवस्थापन करणे ही अत्यंत गरजेची बाब झाली आहे. सदयस्थितीत ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत कचरा व्यवस्थापन हाताळले जात आहे. परंतु, ग्रामपंचायती मार्फत होणारे कचरा व्यवस्थापन हे पुरेसा आर्थिक तरतुदी व संसाधनाअभावी आदर्श कचरा व्यवस्थापन होत नसल्याचे यापुर्वी वारंवार निदर्शनास आलेले आहे. सध्या ग्रामपंचायती मार्फत ग्रामीण हद्दीतील कच-याचे संकलन केले जात आहे. तथापि, शास्त्रीयदृष्ट्या कच-यावर प्रक्रिया केली जात नाही. तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे याकरिता ग्रामपंचायतीकडे आवश्यक निधी, मनुष्यबळ साधन सामुग्री व तांत्रिक सुविधा यांची कमतरता आहे. तरी, पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको- नैना अधिसूचित क्षेत्रात निर्माण होणारा कचरा, सिडकोकडील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मार्फत प्रक्रिया करणेच आवश्यक आहे. परंतु, सदर कचरा व्यवस्थापना करिता लागणारा प्रक्रिया खर्च देण्यास ग्रामपंचायती सक्षम नाहीत, तसेच, कचरा निर्मिती ते सिडको कडील सदयास्थितीतील कार्यरत कचरा प्रक्रिया केंद्र या करिताही येणारा वाहतुक खर्च मोठ्या प्रमाणात येणार आहे व याकरिता ग्रामपंचायतीकडे पुरेशी आर्थिक तरतूद नाही. सबब ग्रामपंचायती मार्फत जमा होणा-या कच-याचे आदर्श व्यवस्थापन करण्याकरिता, सिडको मार्फत ग्रामपंचायती सोबत उचित करार केल्यास तसेच येणारा प्रक्रिया खर्च माफ केल्यास ग्रामपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन करणे शक्य होईल. म्हणून पनवेल ग्रामीण हद्दीतील सिडको नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या प्रस्तावांचा सकारात्मक विचार करुन त्यांचे कचरा व्यवस्थापन सिडको यंत्रणेमार्फत करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

# रायगड एसटीची कोटींची कमाई, पण प्रवाशांना अजूनही यातना — बसस्थानकांची दयनीय अवस्था उघडकीस

**दैनिक युवक आधार**

**रायगड वार्ताहर :** दिवाळीच्या दहा दिवसांत रायगड विभागातील राज्य परिवहन महामंडळाने तब्बल १३ लाख ३५ हजार किलोमीटरचा प्रवास करत जवळपास सात कोटी रुपयांचं उत्पन्न कमावलं आहे. ही आकडेवारी ऐकून वाटतं, रायगड एसटी विभाग सोनं कमावतोय. पण वास्तव मात्र पूर्ण वेगळं आहे. प्रवाशांना या उत्पन्नाचा किंचितही फायदा होत नाही, कारण रायगड जिल्ह्यातील बहुतांश बसस्थानकांची अवस्था आजही अतिशय दयनीय आहे.

महाड, माणगाव, श्रीवर्धन, पेण, अलिबाग, मुरुड, कर्जत आणि रोहा या आठ आगारांमधून प्रवासी सेवा सुरू असली तरी प्रत्येक स्थानकात एकच चित्र दिसतं — मोडकळीस आलेली इमारत, छप्पर गळणारं प्रतिक्षालय, गलिच्छ वातावरण आणि प्रवाशांच्या डोळ्यातील असहाय्यता. बसस्थानकांची दुरवस्था इतकी भीषण आहे की, दिवसभर हजारो प्रवासी इथे येत असले तरी बसण्यासाठी नीट बेंच नाही, पावसात वा उन्हात उभं राहायला छत्र नाही, आणि शौचालयांची अवस्था तर अधिकच वाईट. महिलांसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ सुविधा नाहीत, वृद्धांना व अपंगांना मूलभूत सोयींचा पूर्ण अभाव आहे.पेण बसस्थानकात प्रवाशांची गर्दी कायम असते, पण स्वच्छता आणि प्रकाशयोजना नाही. रात्रीच्या वेळेस परिसर अंधारात बुडतो, सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत,सुरक्षारक्षकांची उपस्थितीही नसते. अलिबागसारख्या पर्यटनस्थळावरही बसस्थानकाचे दृश्य निराशाजनक आहे. महाड आणि माणगाव बसस्थानकांची अवस्था देखील फार वेगळी नाही — इथे गाड्यांचा आवाज, धूळ, कचरा आणि अस्वच्छता हे रोजचं वास्तव आहे. श्रीवर्धनसारख्या किनारी तालुक्यात बसस्थानकावर शौचालयांची दुर्गंधी असह्य झाली आहे. प्रवाशांना लांब रांगा, तिकिट खिडकीवरचा गोंधळ आणि बस वेळांची अचूक माहिती नसल्यामुळे त्रास सहन करावा लागतो.एसटी महामंडळ दरवर्षी उत्पन्नाची आकडेवारी मोठ्या गर्वाने जाहीर करतं. पण हा पैसा नेमका कुठे



खर्च होतो, हे कोणालाही ठाऊक नाही. कोटींचं उत्पन्न मिळवूनही बसस्थानकांच्या दुरुस्तीसाठी, नव्या प्रतीक्षालयांसाठी, स्वच्छ शौचालयांसाठी किंवा प्रकाशयोजनेसाठी काहीही हालचाल होत नाही. लोक दररोज करमुक्त तिकीट विकत घेतात, सरकारच्या खात्यात पैसा जमा करतात, पण बदल काहीच दिसत नाही. प्रशासनाला अभिमान आहे की प्रवाशांनी एसटीला पसंती दिली, पण ही पसंती आता जबाबदारीत रूपांतरित झाली पाहिजे.रायगड जिल्ह्यातील एसटी बस म्हणजे आजही गरीब जनतेचा एकमेव आधार. पण या "गरीबरथ"ला मिळणारी वागणूक पाहता वाटतं, सरकारला या प्रवाशांच्या वेदनांची किंमत नाही. प्रवासी आपलं जीवन जोखमीवर ठेवून या जीर्ण बसस्थानकातून प्रवास करतात. एखादी बस उशिरा आली की त्यांच्या मनात राग नव्हे, तर निराशा निर्माण होते — कारण त्यांना माहित आहे, तक्रार केली तरी फरक पडणार नाही.दिवाळीत मिळालेल्या जवळपास सात कोटींच्या उत्पन्नाचा काही भाग तरी प्रवाशांच्या सोयीसाठी वापरला गेला पाहिजे. हा पैसा फक्त आकडेवारीत न राहता, तो वास्तविक सुधारण्यात रूपांतरित झाला पाहिजे. एसटी महामंडळाकडून सेवा नव्हे, तर जबाबदारीची अपेक्षा आहे. प्रवाशांनी पैसा दिला, विश्वास दाखवला, आता त्या विश्वासाची परतफेड करण्याची वेळ आली आहे. रायगडकरांनी आपल्या प्रवासाला मान मिळावा, हीच अपेक्षा आहे.कोटींच्या उत्पन्नावर नाही अभिमान — प्रवाशांच्या वेदनेवर उत्तर हवं. रायगडकर आता शांत बसणार नाहीत!

# लवकरच 'अटल करंडक एकांकिका' स्पर्धेच्या १२ व्या पर्वाचा शुभारंभ

## ०६ नोव्हेंबरपासून राज्यातील केंद्रांची प्राथमिक फेरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' स्पर्धेचे यंदा १२ वे वर्ष असून त्या अंतर्गत राज्यातील प्राथमिक केंद्रांच्या प्राथमिक फेरीला ०६ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे.




नाट्य चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्ये आहेत. या स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. गेल्या ११ वर्षात स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, सर्वोत्तम स्पर्धास्थळ आणि दर्जेदार परीक्षणामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

स्पर्धेतील अंतिम फेरीतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच लक्षवेधी एकांकिकेला ३० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्कृष्ट विनोदी एकांकिकेला २० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह आणि इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेतील सोलापूर केंद्राची प्राथमिक फेरी ०६ नोव्हेंबरला, कोल्हापूर ७ नोव्हेंबर, रत्नागिरी ८ नोव्हेंबर, नाशिक १५ नोव्हेंबर, जळगाव १६ नोव्हेंबर, पुणे २२ व २३ नोव्हेंबर, रायगड २६ व २७ नोव्हेंबर आणि मुंबई व ठाणे केंद्रांची प्राथमिक फेरी २८, २९ व ३० नोव्हेंबर रोजी नियोजित केंद्रांवर होणार आहे. तर महाअंतिम फेरी ५, ६ आणि ७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

# "असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट्स प्रक्टिसिंग इन चॅरिटी ऑरगनायझेशन" तर्फे जाहिर निषेध

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई :** असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट्स प्रक्टिसिंग इन चॅरिटी ऑर्गनायझेशन आणि मुंबई चॅरिटी ॲडव्होकेट्स बार असोसिएशन, वरळी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आज एक महत्त्वपूर्ण निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे काही प्रसारमाध्यमांकडून माननीय धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य श्री. अमोघ श्यामकांत कलोती यांच्याविषयी केलेल्या वैयक्तिक आरोपांवर संघटनेने तीव्र निषेध नोंदवला आहे.










संघटनेचे अध्यक्ष ॲड. नितीन कदम, सचिव ॲड. अमोल इनामदार तसेच मुंबई चॅरिटी ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. जे. पी. शर्मा व सचिव ॲड. गार्गी पाटोळे यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या या निवेदनात म्हटले आहे की, "धर्मादाय विभागातील माननीय आयुक्तांविषयी काही माध्यमांनी कोणतीही शहानिशा न करता केलेल्या बातम्या, वक्तव्ये आणि आरोप हे गैरजबाबदार आणि दिशाभूल करणारे आहेत. अशा प्रकारच्या असत्य आणि वैयक्तिक स्वरूपाच्या बातम्यांचा आम्ही सर्वतोपरी निषेध करतो."

संघटनेच्या मते, धर्मादाय आयुक्त कलोती यांनी राज्यभरातील विविध धर्मादाय संस्थांमध्ये पारदर्शकता आणि शिस्त निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत असताना काही माध्यमांनी बेबुनियादी टीका केल्याने प्रशासन आणि कायदा क्षेत्रातील प्रतिष्ठेला धक्का बसत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या संदर्भात संघटनेने सर्व पत्रकार आणि माध्यमांना जबाबदारीने व वस्तुनिष्ठपणे बातम्या प्रसिद्ध करण्याचे आवाहन केले आहे.


# रायगड जिल्हा पोलीसतर्फे 'रन फॉर युनिटी'चा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा पोलिस यांच्या वतीने 'रन फॉर युनिटी' या एकात्मतेच्या संदेशाने भारलेल्या धाव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

ही धाव शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता श्रीवर्धन बीच येथे पार पडली.

कार्यक्रमात स्थानिक नागरिक, तसेच श्रीवर्धन पोलीस





ठाणे येथील अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

'रन फॉर युनिटी'च्या माध्यमातून देशातील ऐक्य, बंधुता आणि देशप्रेमाचा



संदेश देण्यात आला. धाव पूर्ण झाल्यानंतर सहभागी नागरिकांना सरदार पटेल यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाची माहिती देण्यात आली आणि सर्वांना एकतेचा संदेश दिला गेला.

या प्रसंगी श्रीवर्धन पोलीस ठाणे तर्फे उपस्थित नागरिकांचे आभार मानण्यात आले तसेच देशाच्या ऐक्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

**आयोजक: श्रीवर्धन पोलीस ठाणे, रायगड जिल्हा पोलीस**

# राष्ट्रीय लेखक दिन : समाजाचे आरसे आणि परिवर्तनाचे शिल्पकार

लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर समाजाच्या विचारसंस्कृतीचे, भावविश्वाचे आणि काळाच्या स्पंदनाचे दस्तऐवजीकरण असते. म्हणूनच लेखक हा समाजाचा सजग साक्षीदार, चिंतक आणि परिवर्तनाचा वाहक असतो. दरवर्षी १ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय लेखक दिन (National Authors Day) हा दिवस या शब्दशिल्पींच्या कर्तृत्वाला, चिंतनाला आणि समाजातील योगदानाला सलाम करणारा दिवस आहे. साहित्य, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक परंपरेच्या संगमातून लेखक समाजाला आरसा दाखवतो, प्रश्न विचारतो आणि कधी कधी त्या समाजाला बदलाच्या दिशेने नेतो. या दिवसाचे महत्त्व फक्त लेखकाच्या गौरवापुरते मर्यादित नाही; ते सामाजिक जाणीवेचा, वैचारिक संवादाचा आणि सांस्कृतिक बांधिलकीचा उत्सव आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, लेखकाचे कार्य हे समाजरचनेच्या विविध घटकांशी निगडित असते. एमिल दुर्खाईमसारख्या समाजशास्त्रज्ञाने 'सामाजिक वास्तव' (Social Facts) या संकल्पनेद्वारे सांगितले की, समाजातील मूल्ये, विचार आणि नैतिकता ही व्यक्तीच्या पलीकडील एक सामूहिक शक्ती आहे. लेखक हीच सामूहिकता आपल्या शब्दांतून प्रतिबिंबित करतो. तो समाजातील वास्तव अनुभवतो, त्याचे अर्थ लावतो आणि त्यावर भाष्य करून समाजाच्या आत्मस्मृतीचा भाग बनतो. म्हणूनच प्रत्येक युगाचा लेखक त्या काळाच्या सामाजिक इतिहासाचा जिवंत साक्षी असतो. त्याची लेखणी काळाला दिशा देते आणि समाजाला अंतर्मुख करते.

भारतीय समाजाच्या संदर्भात पाहता, लेखन हे केवळ अभिव्यक्तीचे साधन नव्हते, तर सामाजिक संवाद आणि परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम राहिले आहे. संतकाव्याची परंपरा असो किंवा सुधारक चळवळीतील लेखन, भारतातील लेखकाने नेहमी सामाजिक जबाबदारी स्वीकारली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत कबीर यांनी शब्दांच्या माध्यमातून समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. पुढे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, प्रबोधनकार ठाकरे, प्रेमचंद, शरतचंद्र, आचार्य अत्रे, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी आपल्या काळातील विषमता, जातिभेद, शोषण आणि अन्याय याविरुद्ध लेखणी उचलली. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, हे लेखक 'सामाजिक बदलाचे शिल्पकार' होते, जे समाजातील मूल्यव्यवस्थेला आव्हान देऊन नवी जाणीव निर्माण करीत होते.

लेखन ही समाजातील सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती असते. पिएर बोर्द्यू यांनी 'Cultural Capital' (सांस्कृतिक भांडवल) या संकल्पनेतून सांगितले की, ज्ञान, भाषा, अभिरुची, आणि प्रतीकात्मक मूल्ये ही समाजातील सत्ता-संबंध ठरवतात. लेखक हाच या सांस्कृतिक भांडवलाचा निर्माता असतो. त्याच्या लेखनातून नवे शब्द, नवी अर्थसृष्टी आणि नवे विचार उदयाला येतात. जेव्हा लेखक समाजातील वंचित, शोषित, अल्पसंख्याक वा उपेक्षित घटकांचा आवाज बनतो, तेव्हा तो समाजातील सत्ता-संबंधांमध्ये असंतुलन दाखवतो आणि न्याय्य रचनेसाठी संघर्ष करतो. म्हणून लेखक हा केवळ सर्जक नसतो, तर सामाजिक न्यायाचा वाहक असतो.



आधुनिक काळातही लेखनाचे स्वरूप बदलले असले तरी त्याची सामाजिक जबाबदारी कायम आहे. डिजिटल माध्यम, सोशल मीडिया, ब्लॉग, ई-पत्रिका यामुळे अभिव्यक्तीची क्षेत्रे विस्तारली आहेत, पण लेखकाचे काम तितकेच कठीण झाले आहे. कारण माहितीचा ओघ, दिशाभूल आणि भावनिक ध्रुवीकरण या नव्या आव्हानांनी लेखकाच्या स्वातंत्र्यावर नवे प्रश्न निर्माण केले आहेत. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट मार्क्युसे यांनी 'Repressive Tolerance' (दमनकारी सहिष्णुता) या संकल्पनेद्वारे सांगितले होते की, आधुनिक समाजात स्वातंत्र्य दिले जाते पण त्याच स्वातंत्र्यातून नियंत्रणही ठेवले जाते. आजच्या काळातील लेखक या नियंत्रणाविरुद्ध, मतस्वातंत्र्याच्या आणि विवेकाच्या बाजूने उभा राहणे आवश्यक आहे. कारण लेखकाचे मौन हे सत्तेचे बळ बनते, तर त्याचा उच्चार समाजाच्या विवेकाचे द्योतक ठरतो.

भारतीय समाजात लेखक हा केवळ साहित्यिक नसून तो समाजकारणी, शिक्षक, विचारवंत आणि चळवळीकर्मीही राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन हे केवळ कायदेपंडिताचे नव्हे, तर समाजशास्त्रीय चिंतनाचे प्रतिक आहे. त्यांच्या लिखाणाने वंचित समाजाला आत्मसन्मान दिला आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवला. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेच्या माध्यमातून सामाजिक वास्तव मांडले; त्यांचे लेखन समाजशास्त्रातील 'लोकसंस्कृतीचे समाजशास्त्र' या संकल्पनेला अधोरेखित करते. अशा लेखकांचे लेखन म्हणजे लोकसंस्कृतीचा आवाज आहे, जो शास्त्रीय आणि लोकजीवनाच्या मधोमध उभा आहे.

लेखक समाजाला केवळ विचार देत नाही, तर विचार करण्याची पद्धत घडवतो. त्याच्या लेखनामुळे वाचकांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. समाजशास्त्रज्ञ अँथनी गिडन्स यांनी 'Reflexivity' म्हणजेच आत्मपरीक्षणात्मक समाज ही संकल्पना मांडली. लेखक हे आत्मपरीक्षण शक्य करतो. तो समाजाला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी देतो. म्हणूनच लेखन हे समाजाच्या आरशासारखे असते; परंतु हा आरसा फक्त वास्तव दाखवत नाही, तर समाज कसा असावा याचाही विचार करायला लावतो. लेखकाची लेखणी समाजाच्या अंतःकरणात उतरते, प्रश्न विचारते आणि कधी कधी विद्रोह घडवते.

आजच्या काळात जेव्हा माहितीचा स्फोट झाला आहे, तेव्हा लेखकाची जबाबदारी अधिक वाढली आहे. तो सत्य आणि असत्य, विचार आणि अफवा, भावना आणि प्रचार यांच्यामधील सीमारेषा स्पष्ट करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखक समाजातील 'सांस्कृतिक मध्यस्थ' (Cultural Mediator) असतो, जो परंपरा आणि आधुनिकता, भावना आणि विवेक, स्थानिकता आणि जागतिकता यांचा संवाद घडवतो. जागतिकीकरणाच्या युगात स्थानिक भाषांतील लेखक समाजाच्या ओळखीचे रक्षण करत आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, पाली अशा भारतीय भाषांतील लेखक समाजाच्या मुळांशी जोडलेले आहेत आणि ते 'स्थानिकतेचे समाजशास्त्र' घडवतात.

लेखकाचे व्यक्तिमत्व हे समाजातील वर्ग, लिंग, जात, धर्म, संस्कृती आणि राजकारणाशी घट्ट गुंफलेले असते. समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांनी सांगितले की, साहित्य समाजाच्या आर्थिक अधिष्ठानाशी निगडित असते. लेखक त्या अधिष्ठानाचे प्रतिबिंब दाखवतो किंवा त्याविरुद्ध आवाज उठवतो. स्त्री लेखक, दलित लेखक, आदिवासी लेखक, अल्पसंख्याक लेखक यांनी त्यांच्या लेखनातून जो नवा दृष्टिकोन मांडला आहे, तो समाजशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या लेखनाने 'प्रभुत्वशाली कथनां'ना आव्हान दिले आणि समाजातील असमानता उघड केली. त्यामुळे लेखक केवळ सौंदर्याचा रचनाकार नाही, तर सामाजिक सत्याचा विश्लेषकही आहे.

राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ उत्सव नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. या दिवशी आपण लेखकांना सन्मान देतो, पण त्याचबरोबर समाज म्हणून आपले वाचन, विचार आणि विवेक तपासतो. वाचकांशिवाय लेखक अपूर्ण आहे, आणि लेखकांशिवाय समाज मुक आहे. म्हणून हा दिवस लेखक-वाचक नात्याच्या संवेदनशीलतेचा दिवस आहे. प्रत्येक लेख, धडा, पुस्तक हे समाजाच्या संवादाचा भाग आहे, प्रत्येक शब्द हा परिवर्तनाचे बीज आहे.

आजच्या काळात जेव्हा अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत, तेव्हा लेखकाने अधिक धैर्याने बोलणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या, लेखकाचे मौन हे 'सांस्कृतिक अधिपत्या'च्या (Cultural Hegemony) बळकटीस कारणीभूत ठरते, तर त्याचा उच्चार लोकशाहीच्या प्राणवायूसारखा असतो. म्हणूनच लेखकाचा सन्मान म्हणजे विचारस्वातंत्र्याचा सन्मान आहे.

एकूणच पाहता, राष्ट्रीय लेखक दिन हा केवळ साहित्याचा नव्हे, तर समाजाच्या आत्म्याचा उत्सव आहे. तो समाजाला स्मरण करून देतो की, लेखणी ही शस्त्र आहे, जी रक्त सांडत नाही, पण समाज जागवते. लेखक हा समाजाच्या विवेकाचा दीपस्तंभ आहे, जो काळोखातही प्रकाश देतो. समाजशास्त्रीय अर्थाने लेखक म्हणजे समाजाच्या चेतनेचा संरक्षक आहे. त्याचे लेखन म्हणजे समाजाच्या स्मृतींचे जतन आणि भविष्याचा आराखडा होय. त्यामुळे या दिवसाचे खरे औचित्य असे की, आपण प्रत्येकजण थोडासा 'लेखक' व्हावा, विचार करणारा, प्रश्न विचारणारा, आणि बदलाची बीजे पेरणारा. शब्दांमध्ये समाज जगतो, आणि लेखक त्याला अर्थ देतो.


राष्ट्रीय लेखक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

**डॉ. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**

# गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपच्या स्टोरेज सोल्युशन्स व्यवसायाला मोबाइल पॅलेट रॅकिंग यंत्रणेसाठी सीई प्रमाणपत्र मिळाले

**सुरक्षितता, अभियांत्रिकी आणि इंट्रालॉजिस्टिक्स उत्कृष्टतेमध्ये जागतिक बेंचमार्क स्थापित करणारी मेड-इन-इंडिया कंपनी**

गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपच्या दृष्टीने नुकतीच एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. त्यांच्या स्टोरेज सोल्युशन्स व्यवसायाच्या स्वदेशी विकसित मोबाइल पॅलेट रॅकिंग (एमपीआर) सिस्टमसाठी टीयूव्ही नॉर्डकडून प्रतिष्ठित कॉन्फॉर्मिट युरोपेन (सीई) प्रमाणपत्र मिळाले आहे. अत्यंत कठोर अशी युरोपियन सुरक्षा आणि गुणवत्ता मानकांचे पालन करणाऱ्या प्रणालीचे महत्त्व ही मान्यता अधोरेखित करते. जागतिक स्तरावर मान्यता मिळालेले अभियांत्रिकी उपाय उपलब्ध करून देण्यात भारताची वाढती क्षमता सिद्ध करते.




संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानाने डिझाइन आणि तयार केलेली मोबाइल पॅलेट रॅकिंग यंत्रणा ही एक उच्च-घनता, उच्च-कार्यक्षमता स्टोरेज सोल्यूशन आहे जी निवडक पॅलेट प्रवेश सुनिश्चित करताना गोदामातील क्षमता वाढवण्यासाठी फिक्स्ड आयल्स काढून टाकते. फ्लोअर-माउंटेड रेलवर सहजतेने सरकणाऱ्या मोबाइल बेसवर उभारण्यात आलेल्या या यंत्रणेत जागेचा उत्तम वापर करण्यात आला असून ती उत्कृष्ट ऑपरेशनल कार्यक्षमता प्रदान करते. सीई प्रमाणपत्रामुळे युरोपीअन मशिनरी डायरेक्टिव्ह आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक कंपॅटिबिलिटी डायरेक्टिव्हचे पालन करण्याची पुष्टी होते, जे सिस्टीमची विश्वासार्हता, सुरक्षितता आणि अभियांत्रिकी उत्कृष्टता अधोरेखित करते.

गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुपचे स्टोरेज सोल्युशन्सचे बिझनेस हेड श्री. विकास चौडाहा म्हणाले, "या प्रमाणपत्रामुळे नवीन उपक्रम, गुणवत्ता आणि स्वावलंबनाबाबतची आमची वचनबद्धता अधिक मजबूत होते. कठोर आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणारे जागतिक दर्जाचे पर्याय भारतात तयार करून आम्ही मॅन्युफॅक्चरिंगमधील भारतीय उद्योगांची क्षमता जागतिक पातळीवर सिद्ध करत आहोत. या प्रमाणपत्रामुळे आत्मनिर्भर भारतावरील आमचा विश्वास अधिक दृढ झाला असून इंट्रालॉजिस्टिक्स आणि प्रगत स्टोरेज तंत्रज्ञानामध्ये भारताच्या नेतृत्वात अर्थपूर्ण योगदान देण्याची आमची आकांक्षा यातून समोर येते." सीई मार्कमुळे एमपीआर सिस्टमसाठी नवीन जागतिक संधी निर्माण होतील. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये, विशेषतः युरोप आणि इतर सीई-अनुपालन क्षेत्रांमध्ये खरेदी आणि नियामक मंजुरी मिळणे सोपे होते. कठोर चाचणी आणि तांत्रिक प्रमाणीकरणाद्वारे समर्थित, मागणी असलेल्या औद्योगिक वातावरणात सिस्टमच्या कामगिरीची ग्राहकांना खात्री मिळते. तसेच जागतिक आणि देशांतर्गत ग्राहकांसाठी या प्रमाणपत्रामुळे विश्वासार्हता वाढीस लागते.

# वसईचा अर्नाळा किल्ला



महारष्ट्रा सारख्या निसर्गाने संपन्न आणि सुंदर अशा प्रदेशात ऐतिहासिक किल्ल्यांना फारच महत्व आहे. पर्यटनाच्या दृष्टीने म्हणूनच हे किल्ले महत्वाचे ठरतात. केळवा फोर्ट, १६व्या शतकात पोर्तुगीजांनी एक ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे किल्ला बांधला , सुंदर आणि प्रसन्न केळवा तळ दक्षिणेकडील ओवरनंतर स्थित आहे. किल्ला पालघर तालुक्यात आहे. हा किल्ला त्यांच्या मराठा राजवटीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या उपयोग करून घेतला. किल्ला सभोवताली अधिकाधिक विस्तीर्ण नैसर्गिक दृश्ये असून सुरुच्या झाडांनी किल्ला व्यापलेला आहे .किल्ला सर्व बाजूंनी पाण्याने वेढलेला आहे, जो भरती आणि ओहोटी च्या वेळी आनंददायक आकर्षक अनुभव प्रदान करतो.ओहोटीच्या काळात हा उत्तम प्रकारे प्रवेशजोगी आणि दृश्यमान आहे आणि स्थानिक देशातील बोट सुविधा किल्यावर येण्यासाठी उपलब्ध आहे.

अर्नाळा सागरी किल्ले मधील उत्तम किल्ला आहे. तो वसई तालुक्यातील, अर्नाळा गावात स्थित आहे. अर्नाळा किल्ला 'जलदुर्ग ' किंवा 'जंजिरे अर्नाळा' असे देखील ओळखले जाते. अर्नाळा अशा मुघल, मराठे, पोर्तुगीज, आणि शेवटी पेशवे म्हणून अनेक साम्राज्याचा ताब्यात आलेली . सुलतान महमूद बेगदा मूलतः इ.स. १५१६ मध्ये हा किल्ला बांधण्यात आला . तेथे अन्न नाही पण पाणी गडावर चांगले उपलब्ध आहे. हा किल्ला आकारात आयताकृती आहे आणि जवळजवळ पाणी वेढला आहे. त्र्यंबकेश्वर, भवानी माता, कालिका माता आणि महादेव अशा अनेक मंदिरे आहेत. तीन प्रवेशद्वार आहे त्यापेकी एक प्रवेशद्वार दोन्ही बाजूंच्या मोठी बुरुज आहे जे किल्ल्याच्या उत्तर बाजूला आहे.पर्यटक म्हणून एकदा तरी या ऐतिहासिक किल्ल्याना भेट द्यायलाच हवी.


# वजन घटवण्यासाठी परिपूर्ण शारीरिक व्यायाम : सूर्य नमस्कार

सूर्य नमस्काराच्य जगतामध्ये आपले स्वागत आहे. सूर्य नमस्कारामध्ये क्रमशः १२ योगासनांचा समावेश आहे. सूर्य नमस्काराबद्धल एक चांगली गोष्ट म्हणजे जे अतिशय व्यस्त असतात , त्यांची सतत तक्रार असते की योगासने करायला पुरेसा वेळ मिळत नाही. त्यांच्यासाठी हे खूप चांगले आहे. खास करून सूर्योदयाच्या वेळी सूर्य नमस्काराचे जलद १२ सेट करणे हा हृदय बळकटीसाठी उत्तम व्यायाम आहे. हीच आसने संथ गतीने केल्याने स्नायू बळकट बनून ध्यान लागण्यास मदत होऊन गहन विश्रांती प्राप्त होते. आणखी म्हणजे यामुळे निर्माण होणाऱ्या स्नायूंच्या ताणाचा आनंद मिळून शरीर लवचिक झाल्याचे जाणवते.

सूर्य नमस्कार जरी उत्तम व्यायाम प्रकार असला तरी तो सुरुवातीला शरीर मोकळे करणारे व्यायाम प्रकार आणि गहन योगासने या दोन्ही मधील दुवा आहे. आपली पहाटेची योग साधना शरीराचा आखडलेपणा कमी करण्यासाठी शरीर शिथिल करणाऱ्या व्यायाम प्रकाराने करा. मग काही संच सूर्य नमस्काराचे करा, ज्यामुळे शरीराची लवचिकता वाढण्यास मदत होईल. मग प्रभावी आसनांमध्ये शरीर आणखी ताणण्यास मदत होईल.

**सूर्य नमस्कार कां उत्कृष्ठ आहेत**

पण हे म्हणजेच सारे काही नव्हे. सूर्यनमस्काराचे अनेक मनोरंजक फायदे आहेत, सूर्य नमस्काराच्या सातत्याने केलेल्या सरावाचा शरीरातील प्रत्येक अवयवाला खूप लक्षणीय लाभ होतो. ह्यातील शक्तिशाली योगासनांचा हृदय, यकृत, आंतडी, पोट, छाती, गळा आणि पाय म्हणजे नखशिखांत असा शरीरावर उत्कृष्ट परिणाम होतो. हे केल्यामुळे रक्ताची शुद्धी होऊन शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो आणि पोटाचे कार्य, आतडी आणि मज्जा संस्थाचे कार्य खात्रीने सुधारते. सूर्य नमस्काराच्या दैनंदिन सरावामुळे ज्यापासून हे शरीर बनले आहे त्या वात, पित्त आणि कफ या त्रिदोषांमध्ये समतोल प्राप्त होण्यास मदत होते.



**१२ मिनिटांच्या सूर्य नमस्कारामध्ये बरेचसे योगासने होतात**

सूर्य नमस्काराच्या एका फेरीमध्ये १२ आसने असतात.

एका संचा मध्ये सूर्य नमस्काराच्या २ फेऱ्या असतात. पहिल्या फेरीत उजव्या बाजूने मग डाव्या बाजूने ताण देता.

म्हणजे जेंव्हा तुम्ही सूर्य नमस्काराचे १२ सेट करता तेंव्हा १२ सेट * २ फेऱ्या, प्रत्येक फेरीमध्ये * १२ आसने = २८८ आसने, तेही १२ ते १५ मिनिटात.

**प्रत्येक सूर्य नमस्कारामध्ये जळणारे उष्मांक**

सर्वसाधारण वजन असणाऱ्या व्यक्तीचे एका सूर्य नमस्कारामुळे सरासरी १३.९० उष्मांक जळतात. आत्ता आपण स्वतःचे लक्ष्य ठरवू शकता. हळूहळू आपण सूर्य नमस्काराच्या १०८ फेऱ्या पर्यंत वाढवू शकता. या लक्ष्यापर्यंत पोहोचेपर्यंत आपण सडपातळ झाला आहात, हे जाणवेल.

**३०-मिनिटे व्यायामाची उष्मांक मोजणी**

चला तर, आपल्या ३० मिनिटे व्यायाम केल्याने किती उष्मांक जळतात पाहूया.

वेट लिफ्टिंग = १९९ उष्मांक
टेनिस = २३२ उष्मांक
बास्केटबॉल = २६५ उष्मांक
बीच हॉलीबॉल = २६५ उष्मांक
फुटबॉल = २९८ उष्मांक
सायकलिंग (१४ – १५.९ मैल प्रति तास) = ३३१ उष्मांक
रॉक क्लाईबिंग = ३६४ उष्मांक
धावणे (७.५ मैल प्रति तास) = ४१४ उष्मांक
सूर्य नमस्कार = ४१७ उष्मांक

इतर व्यायामांच्या तुलनेत सूर्य नमस्कारामुळे सर्वात जास्त उष्मांक जाळणे शक्य आहे.

**योगाने कृतज्ञ राहू**

सूर्यामुळे या ग्रहावर जीवन कसे शक्य झाले आहे, हे शाळेतील धडे लक्षात आहेत नां? तो सोनेरी गोळा सर्वत्र चमक, प्रकाश प्रसारित करतो, अंधकार पळवून लावतो, चराचरामध्ये प्राण फुंकतो, हे सर्व लहानपणी आपण शिकलोय. आता आपल्या सर्वात जवळच्या या ताऱ्याला 'धन्यवाद' देण्याची आपली पाळी आहे. सूर्य नमस्कारामुळे ती संधी प्राप्त होतेय. सूर्य नमस्कार हा त्या प्राणदात्या 'सूर्या' प्रती सन्माननीय कृतज्ञता व्यक्त करत संपूर्ण शरीराचा व्यायाम करण्याचा उत्कृष्ट मार्ग आहे.

वजन घटवण्यासाठी सूर्य नमस्कार करण्यास उत्सुक आहात नां? सूर्य नमस्कार कसे करावे, यासाठी ही साधी पावले उचला. एवढेच करा की योगा मॅटवर या, डौलदारपणे एका मागून एक आसने करा, प्रसन्न रहा आणि स्नायू खिचावांची मजा घ्या. आपल्या सूर्य नमस्कार साधनेला आणखी पवित्र आणि लाभदायक बनवण्यासाठी कृतज्ञतेची जोड द्या. आपला प्रवास आता निरोगी शरीर आणि शांत मन प्राप्त करण्याकडे सुरु झाला आहे.

# रायगड एलसीबीचा धडाकेबाज सर्जिकल स्ट्राईक

## आंतरराज्यीय घरफोडी टोळीला गजाआड; सोन्या-मोत्यासह जिवंत बुलेट्स जप्त

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड जिल्ह्यातील उच्चभ्रू सोसायट्यांमधील भरदिवसा घरफोड्यांचा थरार संपला आहे. रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने अचूक नियोजन आणि तांत्रिक तपासाच्या जोरावर आंतरराज्यीय सराईत घरफोडी टोळीचा पर्दाफाश करत तिघा कुख्यात आरोपींना जेरबंद केले आहे. एलसीबीने या कारवाई दरम्यान सुमारे 15.50 लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि तब्बल 24 जिवंत बुलेट्स जप्त केल्या आहेत.गेल्या काही महिन्यांपासून पाली, रोहा, महाड आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये भरदिवसा सुरू असलेल्या घरफोड्यांमुळे नागरिक भयभीत झाले होते. आरोपी आलिशान होंडा सिटी कारमधून येत, परिसरात रेकी करून बंद घरे ओळखत आणि योग्य वेळी दागदागिने, रोकड लंपास करत.या गुन्ह्यांच्या मालिका रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक ऑंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या नेतृत्वाखाली तीन स्वतंत्र तपास पथके तयार केली. सातारा, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांमध्ये सूक्ष्म तपास सुरू असताना, ३ ऑगस्ट रोजी माणगाव परिसरात फिरत असलेल्या होंडा सिटी कारच्या मागोव्यातून आरोपींच्या टोळीचा हुकूमशहा शाहनवाज कुरेशीपर्यंत पोहोचता आले.विशेष पथकाने उत्तरप्रदेशातील सिकंदराबाद येथे स्थानिक पोलिसांच्या मदतीने अत्यंत शिताफीने छापा टाकला. तणावपूर्ण कारवाईत शाहनवाज कुरेशी (५०), हिना कुरेशी (४५) आणि शमीम कुरेशी (४२) यांना अटक करण्यात आली. शाहनवाजवर उत्तरप्रदेश, हरियाणा आणि दिल्लीसह विविध राज्यांमध्ये खून, दरोडा आणि शस्त्र कायद्यांतर्गत ३० हून अधिक गुन्हे दाखल आहेत. तपासात आरोपींनी रायगड, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील दहा घरफोड्यांची कबुली दिली आहे. त्यांचे काही साथीदार सध्या फरार असून, पोलिसांकडून त्यांच्या शोधासाठी दुसरे विशेष पथक पुन्हा उत्तरप्रदेशात रवाना झाले आहे.या धडाकेबाज ऑपरेशनमुळे रायगड जिल्ह्यात दिलास्याचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले आहे. या यशस्वी कारवाईचे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक ऑंचल दलाल यांनी केले. कारवाईत अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, सपोनि भास्कर जाधव, सपोनि मानसिंग पाटील, पोसई लिंगप्पा सरगर आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अन्य अधिकारी सहभागी होते.रायगड पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरातील कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा गुन्हेगारी माहिती 'रायगड दृष्टी' या व्हॉट्सअॅप चॅटबॉटद्वारे द्यावी. मटका जुगार, अवैध दारू व्यवहार, गांजा तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल, असे रायगड पोलीस अधीक्षक दलाल यांनी सांगितले.




## रजनीकांत बोरेले यांच्या धान्य खरीद दारी - आडतच्या मुहूर्तावर सोयाबीनला ४५०० रुपये भाव

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी-जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा :–**येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील अपक्ष संचालक तसेच प्रसिद्ध धान्य खरीददार व अडतदार रजनीकांत डालूरामजी बोरेले (आर. बी.) यांनी यंदाच्या सोयाबीन खरेदी हंगामाचा शुभारंभ गोपा अष्टमीच्या मुहूर्तावर, दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी विधिवत पूजा-अर्चना करून केला.ढोल-ताशांच्या गजरात, वैदिक मंत्रोच्चार आणि नारळ फोडून मुहूर्त साधत बोरेले यांनी सोयाबीनचा दर प्रती क्विंटल ४५०० रुपये असा जाहीर केला. हा भाव सर्व मंड्या पेक्षा जास्त भाव रजनीकांत बोरेले यांनी दिल्याने विदर्भात चर्चेचा विषय ठरला .या भावाने शेतकऱ्यांमध्ये उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.मुहूर्त खरेदीसाठी आलेल्या ऐकून 26, शेतकऱ्याचा आणि 10, मजूरांचा रजनीकांत बोरेले यांच्या हस्ते वस्त्र, नारळ, हार तसेच अर्धा किलो मिष्ठान ची पेटी भेट देऊन सत्कार करण्यात आला. या



अनोख्या उपक्रमामुळे शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला.

विशेष म्हणजे पांढरकवडा बाजार समितीचा अधिकृत शुभारंभ २७ऑक्टोबर रोजी झाला होता. त्या दिवशी सोयाबीनचे भाव ४०६० रुपयांपासून खाली ८०० रुपयांपर्यंत घसरले होते. मात्र, बोरेले यांच्या खरेदी आणि आडतच्या मुहूर्तावर दर ४५०० रुपयांपासून २००० रुपये (मतीरा) पर्यंत राहिल्याने शेतकऱ्यांना समाधानकारक भाव मिळाला. शेतकऱ्यांमध्ये रजनीकांत बोरेले यांच्यावरील विश्वास इतका आहे की, अनेकांनी २७ ऑक्टोबरलाच बाजार समिती आवारात आपले सोयाबीन ठेवून ३० तारखेच्या त्यांच्या मुहूर्ताची वाट पाहिली. बोरेले यांच्या मर्तवर शेत करी यांची प्रचंड गर्दी होती यावेळी व्यापारी,नीतिन बाजोरिया,प्रमोद भूत, आनंद चोपडा,सुहास कापर्तिवार,महेश आदेवार, गजानन ओसावार, गणेश हटकर, गुंटटू धादोड़ हे सर्व व्यापारी प्रामुख्याने उपस्थित होते, व सचिव सुरेश खानदनकर, हे शुद्धा उपस्तित होते यावी रजनीकांत बोरेले यांचा प्रभाव शाली भाषण झाला हे विशेष"बोरेले खरेदीदारांकडे चांगला भाव आणि प्रामाणिक व्यवहार सन्मान सह मिळतो, अशी चर्चा शेतकऱ्यां मध्ये सुरु होती

## इस्लापूर गणाच्या विकासासाठी डॉ भगवान गंगासागर पंचायत समिती सदस्य पदाच्या रिंगणात उभे रहावे असा जनतेचा आग्रह

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी दिलीप भालेराव**

आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणूकीत पंचायत समिती इस्लापूर गणातून भाजपा तर्फे डॉ. गंगासागर हे उमेदवार रहावे म्हणून जनतेत चर्चा आहे. इस्लापूर शिवणी परिसरात सर्वांना परिचित असलेले स्वच्छ प्रतिमातसेच दिलदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तसेच तीस वर्षापासून अविरत रुग्ण सेवे सोबत समाजकार्य करतात परिसरात आपली एक वेगळीच छाप निर्माण केली आहे. सर्व समाजातील गोरगरिब जनतेला रात्री बेरात्री मदत करत असतात त्यांच जास्त लक्ष शिक्षण, पाणी, शेती, आरोग्य या समस्या जास्त लक्ष




असते. किनवट पंचायत समिति एससी सभापती आरक्षित आहे त्यामुळे गोकुंदा जरी आरक्षित एकच जागा आहे. त्याजागेवर सत्ताधारी पक्षाच्या उमेदवार आल्यास सभापती पद हे मिळू शकते परंतू सत्ताधारी प. स. सीट निवडून न आल्यास सभापती पद विरोधी पक्षास जाऊ शकते म्हणून इस्लापूरला एक प. स. एससी ला देणे देणेच आहे. इस्लापूर जरी सर्वसाधारण असले तरी येथे दूसरा उमेदवार एससी द्यायचा द्यावाच लागतो म्हणून इस्लापूर गणात मत प्राप्त होईल यासाठी सर्वामते योग्य उमेदवार डॉ. गंगासागर योग्य वाटतात अशी जनतेत चर्चा आहे. जर पक्षाने संधी दिली तर संधीच सोनं करू असे मत डॉ. गंगासागर यांनी व्यक्त केले.

## रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट सेलू या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मुख्याधिकारी नगरपरिषद सेलू यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार सेलू तालुका**
**प्रतिनिधी (ग्रामीण):विठ्ठल राऊत**

मुख्याधिकारी नगर परिषद सेलू यांना आज दिलेल्या निवेदनात म्हटले आहे,रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट सेलू हा रस्ता अत्यंत रहदारीचा आहे. तसेच या रस्त्यावर शाळा, महाविद्यालय, शिकवणी वर्ग व अनेक दुकाने आहेत. हा रस्ता सेलू शहरातून जातो. या रस्त्यावर लहान व मोठी वाहने वाहतात या मार्गावर वाहन चालक बेदरकारपणे व वेगाने वाहने चालवत आहेत. यात अनेक अपघात होऊन अनेक जणांनी आपले प्राण गमावले आहेत व अनेक जण कायमचे अपंग झाले आहेत. या



रस्त्यावर लहान मुले आबाल वृद्धांचे वागणे असते. त्यांना या रस्त्यावर या वाहनांमुळे चालणे मुश्किल झाले आहे. या वाहनांना वेगाला आवर घालण्यासाठी या मार्गावर गतिरोधकाची अत्यंत गरज आहे.

आपल्याला वारंवार लेखी निवेदन देऊन व तोंडी सांगून पण आपण या मार्गावर गतिरोधक बसवले नाहीत. तरी ताबडतोब या रस्त्यावर गतिरोधक बसून नागरिकांच्या जीवाशी होणारा खेळ थांबवावा. नसता दिनांक 7-11-2025 रोजी सकाळी 11-00 वाजता दुधना नदी मोरेगावच्या पात्रात सेलूवासीया तर्फे जलसमाधी आंदोलन करण्यात येईल. यात काही बरे वाईट झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील असे निवेदनात म्हटले आहे यावेळी जयसिंग शेळके, मोहन मोरे, विनोद धापसे, कृष्णा पडघन, वसंत आवटे, निशिकांत रोडगे, शाम रोडगे, उत्तम लोखंडे, उध्दव डूबल, मारोती ढोले उपस्थित होते.

## आशियातील सर्वात मोठ्या लासलगाव बाजार समितीला फ्रान्सच्या शिष्टमंडळाची भेट

**दैनिक युवक आधार**
**महेश साळुंके/लासलगाव**

आशिया खंडातील सर्वात मोठी कृषि उत्पन्न बाजार समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव बाजार समितीस फ्रान्स देशातील नागरिकांच्या एका शिष्टमंडळाने सदिच्छा भेट दिली. सदर शिष्टमंडळाने येथील कांदा लिलाव, वजनमाप, ग्रेडींग, पॅकींग, लोडींग इ. प्रक्रियेची माहिती घेऊन सध्या कांद्यास मिळत असलेले बाजारभाव आणि शेतकरी बांधवांच्या समस्या जाणून घेतल्या.



सदर शिष्टमंडळाने बाजार समितीच्या कांदा बाजार आवारास भेट देऊन कांदा लिलाव प्रक्रियेचे थेट निरीक्षण केले. यावेळी कांद्याचे बाजारभाव कसे ठरतात, लिलावाची प्रथम व अंतीम बोली कोण देतो, कांद्याचा हंगाम, लिलाव प्रक्रियेचे इतर नियम आणि मालाची आवक-जावक याबाबत उपस्थित पदाधिकारी, शेतकरी व व्यापारी वर्गाकडुन सविस्तर माहिती जाणुन घेतली. विशेषतः कांद्याच्या सध्याच्या बाजारभावाविषयी त्यांनी शेतकरी प्रतिनिधींशी आणि बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. कांद्याच्या उत्पादनाचे अर्थकारण आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील संधी यावरही त्यांनी विचारविनिमय केला.

सदर शिष्टमंडळात कॅथरीन, मेरीलाइन, फिलिप, ऍनी, डोरिस, इसाबेल, थियरी, मार्टिन, मेरी, हर्वे, बेनेडिक्ट, ह्युबर्ट, ॲलेक्स, निकोल ह्या नागरीकांसह विवेक आणि मनोज जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी मुंबई व लासलगांव बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, बाजार समितीचे उपसभापती संदीप (ललित) दरेकर, सदस्य सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, पंकज होळकर यांच्यासह इतर मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना लासलगाव बाजार समितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व कार्यप्रणाली समजावून सांगितली. याप्रसंगी बाजार समितीच्या वतीने सदर शिष्टमंडळाचा भारतीय संस्कृतीप्रमाणे टोपी, उपरणे व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर लासलगावच्या बाजारपेठेला मिळालेले हे महत्त्व शेतकऱ्यांसाठी अधिक महत्त्वाचे ठरणारे असून, यानिमित्ताने परदेशी नागरिकांना भारतीय शेतमालाच्या बाजारपेठेची आणि शेतकरी बांधवांच्या परिस्थितीची माहिती मिळाली.

## भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अड्याळ पोलीस स्टेशन येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे महाराष्ट्र प्रतिनिधी**

भंडारा पवनी तालुक्यातील अड्याळ पोलीस स्टेशन अंतर्गत चकारा रोड येथे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक 31 ऑक्टोबर 2025 ला सकाळी ६.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव कोरवते व सरपंच शिवशंकर मुंगाटे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून




त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सद्भावना रॅली करण्यात आली. चला एकतेच्या दिशेने पाऊल टाकूया आणि भारताच्या ऐक्याचा संदेश देऊया, एक धाव,एक भारत ,एक आमची ताकद असा संदेश देण्यात आला. यावेळी पोलीस विभागाचे कर्मचारी,नागरिक, विद्यार्थी, पत्रकार ,पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता गोपनीय विभागाचे जितेंद्र वैद्य त्यांनी विशेष सहकार्य केले.

## अनुसूचित जाती एस सी उपवर्गीकरण समिती रद्द करा या प्रमुख मागणी करता भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयावर आंबेडकर वाद्यांचा निघाला होता भव्य मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** आज दिनांक 31 ऑक्टोबर 2025 ला दुपारी 12 वाजता दसरा मैदान ते त्रिमूर्ती चौक भंडारा येथे आंबेडकर वाद्यांचा भव्य मोर्चा निघाला .त्या मोर्चामध्ये संविधान जिंदाबाद ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर अमर रहे ,अनुसूचित जाती एस सी उपवर्गीकरण समिती रद्द करा अशा प्रकारच्या घोषणाबाजी करण्यात आले .त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर येथील त्रिमूर्ती चौकात सभेचे रूपांतर झाले .या या सभेत बऱ्याच मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनुसूचित जाती जमातीमध्ये उपवर्गीकरण करण्याचे राज्यांना घटनात्मक अधिकार असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने



1 ऑगस्ट २०२४ रोजी दिला. उपवर्गीकरणाच्या या निर्णयाविरुद्ध संपूर्ण भारतात 21 ऑगस्ट 2024 रोजी आंबेडकर वाद्यांनी भारत बंदची हाक देत यशस्वी भारत बंद आंदोलन केले. महाराष्ट्र राज्याच्या विचार केला तर 15 ऑक्टोंबर 2024 रोजी उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

नुकतेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना सांगितले की ,उपवर्गीकरण समितीचे काम अंतिम टप्प्यात असून येणाऱ्या 3 महिन्यात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण लागू करण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्रात आरक्षणाच्या नावावर वाद निर्माण करण्याचा षडयंत्र होत आहे. व तो आज खऱ्या अर्थाने आपला आरक्षण धोक्यात आलेला असून अभी नही तो कभी नही ही वेळ येऊन ठेपलेली आहे.

म्हणून राज्य सरकारच्या या निर्णयाच्या विरोध करण्यासाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सरकारने समजा जर उप वर्गीकरण लागू केले तर राजकारणात सुद्धा उपवर्गीकरण लागू करण्यात यावे अशी सुद्धा आंबेडकर वाद्यांची मागणी आहे. शिष्टमंडळ

यांच्या वतीने जिल्हाधिकारी भंडारा यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनाच्या प्रती महाराष्ट्राचे सामाजिक व न्याय मंत्री, अनुसूचित जाती आयोग यांना पाठविण्यात आले.यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मोर्चा यशस्वी करण्याकरता वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, आजाद समाज पार्टी ,बी आर एस पी ,आंबेडकर वाद्यांच्या सर्व संघटना ,महिला भगिनी सर्वांनी सहकार्य केले.

## रन फॉर युनिटी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विजेत्यांचा गौरव व वृक्षारोपण कार्यक्रमाने लोहपुरुषांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त "रन फॉर युनिटी" या उपक्रमाचे आयोजन सोयगाव पोलीस ठाण्याच्यावतीने करण्यात आले. दोन किलोमीटर अंतराच्या या धाव स्पर्धेला सोयगाव शहरातील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.युवकांमधील देशभक्ती व एकतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात स्पर्धकांनी जोमाने सहभाग घेत प्रथम,द्वितीय

तृतीय क्रमांक पटकाविलाना. सोयगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज जी बारवाल,व नगरसेवक बंटी भाऊ काळे,राजु दुतोडें, मराठा क्रांती मोर्चा विजय भाऊ काळे,कूषी भुषण अरूण सोहणी,पत्रकार विजय चौधरी,संतोष सोहणी,यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह वाटण्यात आले.



> सोयगाव शहरातील युवकांनी "रन फॉर युनिटी" मध्ये घेतलेला उत्स्फूर्त सहभाग खरोखर प्रेरणादायी आहे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा उपक्रम एकतेचा आणि देशभक्तीचा संदेश देणारा ठरला.
> **नगरसेवक बंटी भाऊ काळे**

या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड,अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग,तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (सिल्लोड) डॉ.दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव

> पोलीस विभागाने वृक्षारोपणासारख्या सामाजिक उपक्रमांचा समावेश करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला, हीही कौतुकास्पद बाब आहे. समाजातील सर्वांनी अशा उपक्रमांना पाठिंबा देत एकजूट आणि जबाबदार नागरिकत्वाचे उदाहरण घालावे,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.
> **समाजसेवक राजु दुतोडें**

पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या हस्ते पोलीस स्टेशन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे "एकता, पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छ भारत" यांचा संदेश देण्यात आला.

उपस्थितांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.